cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१५६ | बुधवार, दि.०१ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# मागणी ओला दुष्काळाची, पण तशी तरतूदच नाही !

## मुख्यमंत्री फडणवीस यांची स्पष्टोक्ती, शेतकऱ्यांना केवायसीची अट शिथिल

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या महिन्यात सातत्याने अतिवृष्टी झाली त्यात शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्याचा आढावा घेतला. सुमारे ६० लाख हेक्टर नुकसान झाल्याचा अंदाज असून, पहिल्या टप्प्यात ऑगस्ट पर्यंत २ हजार २१५ कोटी रुपये वितरित करण्यास सुरुवात केली आहे. पण सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे आणि पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ जाहिर करण्याची मागणी करण्यात येत आहे. पण तशी तरतूद नसल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस बोलताना माहिती दिली.**



पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ई केवायसी अट शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील दोन दिवसात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची सर्व माहिती पोहोचेल. परंतु अनेक ठिकाणी पूराचे पाणी असल्यामुळे योग्य व अचूक माहिती आलेली नाही. पंचनामे करण्यास त्यामुळे वेळ दिलेला आहे. त्याचबरोबर सरकारकडून जी मदत देण्यात येणार आहे त्यात शेतजमीन, घर व तातडीची मदत असेल. तसेच वेगवेगळ्या प्रकारे, जे नुकसान झाले आहे. त्याबाबत एक पॉलिसी तयार करून पुढच्या आठवड्यात घोषणा करू असे सांगत सगळी मदत ही दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात देण्यात येणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पान २ वर

### शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मिळणार मदत

मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत पूरस्थितीचा आढावा घेण्यात आला असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा पूर्ण प्रयत्न राहिल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. तसेच, मॅन्यूअलमध्ये ओला दुष्काळ ही संकल्पनाच नाही, तरीही दुष्काळाच्या सर्व सवलती लागू केल्या जातील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस म्हणाले आहेत. ज्यावेळी दुष्काळ पडतो त्यावेळी ज्या ज्या उपाययोजना, सवलती आपण देतो त्या सगळ्या सवलती आता तशाच प्रकारची दुष्काळी टंचाई पडली आहे असे समजून त्या सगळ्या सवलती याही वेळी लागू करण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतला आहे, अशी माहिती ही फडणवीस यांनी दिली.

## थोडक्यात...

### ...ही तर नथुराम गोडसेंची औलाद - विजय वडेट्टीवार

नागपूर: नथुराम गोडसेची औलाद बनून राहुल गांधी यांना गोळ्या घालण्याचे भाजप नेत्याने दिलेले वक्तव्य हे देशातील लोकशाही संपुष्टात आणण्यासाठी केलेले आहे, असा संताप भाजप नेत्याच्या वक्तव्यावर काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला आहे. एक व्यक्ती लोकशाही वाचवण्यासाठी गरीब, मजूर, शेतकरी यांचा आवाज बनून संघर्ष करत आहे. दलित, ओबीसी, आदिवासी यांच्यासाठी लढणाऱ्या नेत्याला गोळ्या घालण्याची भाषा भाजप करत आहे हा पोरखेळ आहे का? तातडीने या व्यक्तीवर कारवाई केली पाहिजे नाहीतर ही सरकारची अधिकृत भूमिका आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

### लस निर्मितीसाठी २५ कोटी -अजित पवार

पुणे: लस निर्मितीच्या क्षेत्रात हाफकिन संस्थेचे मोलाचे योगदान असून, देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यामध्ये हाफकिनचा मोठा वाटा आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी आहे. या लसींची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकारातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, विधान परिषद सदस्य सचिन अहिर, हापकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसाठी भारताचे दरवाजे झाले खुले

नवी दिल्ली: आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना भारतात कॅम्पस स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जुलै २०२५ मध्ये यूकेच्या 'युनिव्हर्सिटी ऑफ साऊथम्पटन'ने भारतात पहिले विदेशी कॅम्पस सुरू केले आणि उच्च शिक्षण भागीदारीच्या नव्या युगाची सुरुवात झाली. दिल्ली-एनसीआर, मुंबई, बंगळूर आणि अहमदाबाद ही शैक्षणिक विस्तारासाठीची पहिली प्रमुख केंद्रे म्हणून उदयास येत आहेत. 'युनिव्हर्सिटी ऑफ लिव्हरपूल'ला बंगळूरमध्ये, तर 'युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क', 'युनिव्हर्सिटी ऑफ ॲबरडीन' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टॉल' यांना मुंबईत कॅम्पस सुरू करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. जुलै २०२५ मध्ये स्वीकारलेल्या 'इंडिया-यूके व्हिजन २०३५'मुळे भारतीय विद्यार्थ्यांना यूके शिक्षण प्रणालीशी जोडले जाण्याचे अनेक मार्ग उपलब्ध झाले आहेत.

### जयंतराव, सांग....मंगळसूत्र मी चोरलंय -आ.पडळकर

सांगली: गेल्या काही दिवसापासून भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. गोपीचंद पडळकर हे सातत्याने जयंत पाटील यांच्या खालच्या शब्दात टीका करत आहेत. आज पुन्हा पडळकरांनी जयंत पाटील यांच्यावर जहरी टीका केली आहे. मला मंगळसूत्र चोर म्हणतात, जयंत पाटील यांनी सांगावं त्याच्या कितव्या बायकोचे मी मंगळसूत्र चोरले, अशा शब्दात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी टीका केली आहे.

## अतिवृष्टीत 'डीपीडीसी'चा १० टक्के निधी वळवणार !

### राज्य सरकारची परवानगी, अतिवृष्टीग्रस्त जिल्ह्यांना होणार फायदा

**मुंबई । प्रतिनिधी**

पूरस्थिती आणि टंचाईच्या काळात तातडीने करावयाच्या मदतकार्यासाठी वेळेत निधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने जिल्हा वार्षिक योजनेतील एकूण दहा टक्के निधी वापरण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. नियोजन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी केला. या निर्णयामुळे सध्या पूरस्थितीचा सामना कराव्या लागणाऱ्या जिल्ह्यांत हा निधी वापरता येणार आहे.

राज्याच्या विविध भागांत विशेषतः मराठवाड्यातील जिल्हे आणि सोलापूर



जिल्ह्याला अतिवृष्टीचा तडाखा बसला आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून (एनडीआरएफ) जिल्हा प्रशासनाला निकषानुसार निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र, अतिवृष्टीने निर्माण केलेल्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे तातडीने करायच्या कामांची यादी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा वार्षिक नियोजनातील पाच टक्के निधी वापरण्याची मुभा देण्यात आली आहे. 'डीपीडीसी' अंतर्गत नियमित योजनांसाठी मंजूर असलेल्या ९५ टक्के निधीमधून अतिवृष्टी, गारपीट आणि पूरस्थितीचा सामना करण्यासाठी पाच टक्के तसेच, टंचाईग्रस्त परिस्थितीत पाच टक्के निधी उपलब्ध करून देता येणार आहे. एखाद्या जिल्ह्यात एका आर्थिक वर्षात प्रथम टंचाई आणि त्यानंतर अतिवृष्टी, पान २ वर



## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी एक कोटी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरात आलेल्या अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर शेतीचे नुकसान झालं आहे. या परिस्थितीत शेतकरी बांधवाना मदत व्हावी यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी एक कोटीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी आज मंत्रालयात सुपूर्द केला. राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीत मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अतिवृष्टी व पुरामुळे शेतकरी बांधवांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत पान २ वर

## राज्यावर पुन्हा पावसाचे सावट !

### ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या ११५ टक्के पावसाचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. सप्टेंबर महिन्यात तिसऱ्या आठवड्यात पावसाने सरासरी ओलांडली होती, त्यामुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. राज्यात आता ऑक्टोबर महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता असून कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यासह विर्दभात काही भागात पावसाची शक्यता अधिक असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. त्यामुळे राज्यावर पुन्हा पावसाचे सावट निर्माण झाले आहे.

देशात ऑक्टोबर महिन्यात दिर्घकालीन सरासरीच्या ११५ टक्के पावसाचा अंदाज आहे. परंतु उत्तर-पश्चिम भागासह दक्षिण द्विपकल्पीय राज्यातील काही भाग आणि ईशान्य भारतात एक दोन ठिकाणी सामान्य पावसाची शक्यता आहे, असा अंदाज आहे. ऑक्टोबर तसेच मॉन्सूनत्तर पावसाच्या पान २ वर

## नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना आता दुप्पट शिष्यवृत्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता नववी आणि दहावीच्या तीन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना दुप्पट शिष्यवृत्ती मिळणार आहे. राज्य सरकारने आपली जुनी शिष्यवृत्ती योजना बंद केली आहे. त्याऐवजी केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जास्त आर्थिक मदत मिळेल. तसेच, राज्य सरकारचे दरवर्षी ३३ कोटी रुपये वाचणार आहेत. हा निर्णय**



**विद्यार्थ्यांच्या फायद्याचा आणि राज्याच्या तिजोरीसाठी चांगला आहे.**

या निर्णयामुळे नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे. आधी राज्य सरकारच्या योजनेतून त्यांना दरवर्षी दोन हजार रुपये मिळत होते. आता केंद्र सरकारच्या योजनेमुळे सामान्य विद्यार्थ्यांना दरवर्षी किमान तीन हजार ते ६२५० रुपये मिळतील. दिव्यांग विद्यार्थ्यांना तर किमान ७२०० ते ९६०० रुपये वार्षिक शिष्यवृत्ती मिळेल. ही वाढ विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वाची आहे. यामुळे त्यांना शिक्षणासाठी अधिक आर्थिक पाठबळ मिळेल. या बदलामुळे राज्य सरकारला मोठा आर्थिक फायदा होणार आहे. आधी राज्य सरकारला या विद्यार्थ्यांसाठी पान २ वर

## मोटार सायकल अपघातात दोन ठार

**गेवराई/ तलवाडा । प्रतिनिधी**

**मोटारसायकलची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दोन युवक जागीच ठार झाल्याची घटना तलवाडा - माजलगाव जवळच्या राजुरीमळा येथे मंगळवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे.**



या अपघातात नवनाथ उत्तम राठोड रा.देवीतांडा (वय ३५ वर्षे) आणि विजय उर्फ बाळू सीताराम शिंदे रा.राजुरीमळा तहत तलवाडा (वय ३५ वर्षे) यांचा समावेश आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीत गेवराई - तलवाडा - माजलगाव रोडवर असलेल्या राजुरीमळा पान २ वर

## विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेसकडून समन्वयकांची नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधान परिषदेच्या २०२६ मध्ये होणाऱ्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देशानुसार ज्येष्ठ नेत्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी पक्षाचे वरिष्ठ नेते, काँग्रेस वर्किंग कमिटीचे



सदस्य, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तर विधान परिषदेचे गटनेते माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील यांच्याकडे नागपूर पदवीधर मतदार संघाच्या समन्वयक पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाच्या समन्वयक पदाची जबाबदारी माजी मंत्री व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. सुनिल देशमुख यांच्याकडे देण्यात आली आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या समन्वयकपदी माजी आमदार, प्रदेश पान २ वर

## यश ढाका खून प्रकरणात तिघे अटक

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका खून प्रकरणात आतापर्यंत पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. दि. २५ रोजी रात्री शहरातील माने कॉम्प्लेक्स भागात यश ढाका याचा चाकूने भोसकून खून करण्यात आला होता.

या प्रकरणात सुरज अप्पासाहेब काटे (रा.बीड) याला पोलिसांनी घटनेनंतर अर्ध्या तासातच पकडले होते. त्यानंतर सोमवारी सोमनाथ उर्फ चिकू काटे यास अटक केली तर मंगळवारी कृष्णा सोनवणे याला पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० सप्टेंबर २०२५


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८५.०० क्विंटल | २,३०० | २,८०१ | २,५६६ |
| ज्वारी/हायब्रिड: १००.०० क्विंटल | २,१०१ | ३,०३८ | २,४७५ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १४.५० क्विंटल | ६,२०० | ६,२५१ | ६,२३३ |
| उडीद : ६१.०० क्विंटल | ३,९०१ | ५,५०० | ५,०२० |
| बाजरी: ७३.५० क्विंटल | २,१५० | २,९३० | २,६११ |
| मुग: १०.०० क्विंटल | ४,८०० | ६,५५० | ५,५९५ |
| सोयाबीन: १७.०० क्विंटल | ४,००१ | ४,४०० | ४,१८५ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,४०० | ६,४०१ | ५,०३३ |

## भगवान भक्तीगड नारायणगडासह राज्यात ५ दसरा मेळावे !

**बीड- मुंबई / प्रतिनिधी**

**दसरा मेळावा म्हटले की, पूर्वी शिवसेना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भगवानगडावरील स्व.गोपीनाथ मुंडे यांचा ऊसतोड कामगार यांचा मेळावा असायचा. आता शिवसेनेचे दोन मेळावे स्वतंत्र होत आहेत पण याच दसरा मेळाव्याच्या दिवशी राज्यातील राजकारणाला कलाटणी देणारी योजना, विधानं केली जातात. नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा, मुंबईत शिवसेनेच्या दोन्ही गटांचा, भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे**







**यांचा भगवान बाबांच्या जन्मस्थळी सावरगाव येथे तर मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे हे देखील नारायणगडावर आपला दुसरा दसरा मेळावा आयोजित करत आहेत. राज्यात एकाच दिवशी होणाऱ्या या पाच मेळाव्याकडे राज्याचे लक्ष लागून आहे.**

भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यादेखील दरवर्षी दसरा मेळावा घेतात. स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या निधनानंतर हा मेळावा पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील संत भगवान बाबा यांच्या जन्मस्थळी म्हणजेच भगवान भक्तीगडावर होत आहे. दरवर्षी लाखोंच्या संख्येने भाविक ऊसतोड मजूर कामगार यासाठी येतात. या मेळाव्यासाठी हेलिपॅड देखील तयार करण्यात आले असून, हेलिकॉप्टरने मंत्री पंकजा मुंडे सकाळी ११ वाजून १५ मिनिटांनी त्या ध्यान मंदिरात जाऊन पूजा करतील. ते या सध्याच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात काय बोलणार याकडे राज्याचे लक्ष लागून आहे. यातच मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांचाही दुसऱ्यांदा बीड जिल्ह्यात दसरा मेळावा होणार आहे. बीडच्या नारायणगडावर या दसरा मेळाव्याची तयारी सुरू झालेली आहे. मराठा समाजाला आरक्षण दिले नव्हते त्यावेळी पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# स्वयंस्फूर्ती कामी आली !

बालविवाहांच्या समस्येवर मात करण्यात भारत सरकारला यश येत असल्याचा निष्कर्ष संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत सादर झालेल्या अहवालाद्वारे केला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत तो अहवाल सादर करण्यात आल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत सुमारे चार लाखांपेक्षा जास्त बालविवाह रोखण्यात यश आल्याचे जस्ट राइटस् फॉर चिल्ड्रेन या संस्थेचे भुवन प्रभू यांनी माध्यमांना सांगितले. त्यांच्या संस्थेने तो अहवाल सादर केल्याचेही त्यांनी सांगितले. या निष्कर्षाचे समाज स्वागत करेल. कारण भारतात ही गंभीर समस्या आहे.

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाच्याच एका अहवालानुसार देशात सुमारे दोन दशलक्ष मुलांचे बालविवाह संभवतात. अशा काही घटनांच्या तक्रारी नोंदवल्या जातात म्हणून त्या उघडकीस येतात. अन्यथा 'तेरी भी चूप' या पद्धतीने कानाकोपर्यात बालविवाह उरकले जात नसतील कशावरून? वास्तविक बालविवाह प्रतिबंधक कायदा आहे. अनेक सामाजिक संस्था या क्षेत्रात स्वयंस्फूर्तीने काम करतात. कायद्याच्या आधारे बालविवाह रोखले गेल्याचे वृत्त अधूनमधून प्रसिद्ध होते. उपरोक्त निष्कर्ष त्याची पुष्टी करणारा ठरू शकेल. शिवाय असे विवाह करणाऱ्या आणि विवाह लावून देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रसंगी कारवाईदेखील केली जाते. तरीही बालविवाह पार पडतात. चार लाख विवाह थांबवले गेले म्हणजेच तेवढे विवाह पार पडणार होते. असे का घडते? आर्थिक आणि सामाजिक असुरक्षितता ही त्याची दोन मुख्य कारणे मानली जातात. मुली आणि महिलांच्या दृष्टीने सामाजिक वातावरण नेहमीच असुरक्षित आढळते. त्यांच्याविरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. घराबाहेर पडलेल्या मुलीसंदर्भात एखादा अपघात तर घडणार नाही ना, या शंकेने पालक धास्तावलेले असले तर नवल नाही. संसाराचा ताळमेळ बसवण्यासाठी पती-पत्नी दोघांनीही कमावणे अत्यावश्यक आहे, असे मानणारा वर्ग मोठा आहे. पण मुलीला एकटेच घरी ठेवण्यास तयार नसतात. परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी मुलींचे अकाली विवाह पार पडतात. मुलीला सासरी पाठवून तिचे पालक सुटकेचा श्वास सोडतात. तथापि, पालकांची आर्थिक परिस्थिती बदलत असून अनेक जण त्यांच्या मुलींचे अकाली विवाह लावत नाहीत, असे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. आर्थिक स्तर वाढत चालला असावा, असाही याचा एक अर्थ निघू शकेल.

गेल्या दशकभरात सुमारे २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले आहेत, असे पंतप्रधानांनी नुकतेच जाहीर केले. त्याचाही हा एक परिणाम संभवत असू शकेल का? या समस्येवर काही प्रमाणात का होईना पण सरकारला यश येत असेल तर ती आनंदाची बाब ठरावी. कारण बालविवाहाचे दुष्परिणाम त्या कुटुंबापुरतेच मर्यादित नसतात. असे विवाह विशेषतः मुलींच्या शिक्षणाच्या मुळावर येतात. मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण मुलांच्या तुलनेत जास्त असते. मुलगी अकाली माता बनण्याचा धोका वाढतो. त्याचा परिणाम अर्भक आणि माता मृत्यूत संभवतो. बालकांचे कुपोषण वाढू शकते. मातेचे वय समजदार नसते. त्याचा परिणाम बाळाच्या सर्वांगीण वाढीवर संभवतो. या समस्यांच्या निराकरणासाठी सरकार अनेक योजना मोफत राबवते. त्यासाठी प्रचंड निधी खर्ची पडतो. हा एकप्रकारे राष्ट्रीय तोटाच नव्हे का? अकाली विवाह करून दिला म्हणजे मुलीच्या पालकांची सुटका होते हा तद्दन गैरसमज असतो. कारण बालविवाहामुळे मुलीच्या आयुष्यात उद्भवणाऱ्या समस्यांना तिच्या पालकांनाच तोंड द्यावे लागते. म्हणूनच नोबेल पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांनी बालविवाहमुक्त भारत आंदोलन छेडले होते. मिळून साऱ्यांच्या प्रयत्नांनी यासंदर्भात हळूहळू जागरुकता निर्माण होत आहे. अकाली विवाह नाकारणाऱ्या मुलींची संख्या कासवाच्या गतीने का होईना पण वाढत असल्याचे मानले जाते. राजस्थानच्या अजमेर-केकरी परिसरातील १४-१५ गावांचे उदाहरण चपखल ठरू शकेल. या गावांमधील अनेक मुली त्यांचे बालविवाह नाकारतात. त्यांना तिथली महिला जनाधिकार समिती पाठबळ देते. या मुली फुटबॉल खेळतात. काही जणी राष्ट्रीय स्पर्धादेखील खेळल्या आहेत. त्यांच्या यशोगाथेची दखल माध्यमांनीदेखील अनेकदा घेतली. सामाजिक समस्यांवर सरकार-सामाजिक संस्था आणि लोकसहभागातून शाश्वत उपाय शोधले जाऊ शकतात. फक्त तशी इच्छाशक्ती असावी लागते. हेच यावरून लक्षात येते.

## रंजेगावात तिर्रट जुगार खेळणारे सहा जणांना अटक! सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशनच्या पथकाने मौजे रंजेगाव येथे एका जुगार अड्ड्यावर छापा टाकून सहा इसमांना जुगार खेळताना रंगेहाथ पकडले आहे. पोलीस उपनिरीक्षक (पोउपनि) गोलवाल साहेब यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रंजेगाव येथे अनंत घुमरे यांच्या घरामागे लिंबाच्या झाडाखाली काही इसम पत्त्यांवर पैसे लावून 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत आहेत. या खात्रीलायक माहितीच्या आधारे पोउपनि श्री. गोलवाल साहेब यांनी प्रभारी अधिकारी सपोनि श्री. घुगे साहेब यांना कळवले. त्यानंतर सपोनि श्री. मधुसूदन घुगे साहेब, पोउपनि अर्जुन गोलवाल साहेब, फिर्यादी दिपक दशरथ धोंडे (पो. काँ/१६३७) आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह पथकाने पंचांसह घटनास्थळी छापा टाकला. पोलीस पथकाला पाहताच जुगार खेळणारे इसम पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले.ताब्यात घेतलेल्या सहा आरोपींची नावे रामेश्वर दादाराव आबुज (वय ६५ वर्ष) विठ्ठल राजाराम आवुज (वय ६७ वर्ष) चंद्रकांत जगन्नाथ आबुज (वय ४२ वर्ष) विनायक बळीराम आबुज (वय ५५ वर्ष) महादेव भरत आबुज (वय ६० वर्ष) राधाकिसन दगडुबा आबुज (वय ६० वर्ष) (सर्व राहणार रंजेगाव, ता. जि. बीड) अशी आहेत. आरोपींच्या अंगझडतीत व त्यांच्या खेळण्याच्या जागेवर जुगारासाठी वापरण्यात आलेली रोख रक्कम आणि सहा मोबाईल फोन मिळून आले. तसेच ५२ पत्त्यांची गड्डी देखील जप्त करण्यात आली. पोलीस अंमलदार दिपक दशरथ धोंडे यांच्या फिर्यादीवरून अटक केलेल्या सहा आरोपींविरुद्ध कलम १२ (अ) जुगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई मा पोलीस अधीक्षक नवनीत कावत सो, अपर पोलीस अधीक्षक पांडकर सो व उप विभागीय पोलीस अधिकारी हनपुड सो यांच्या मार्गदर्शन खाली पिंपळनेर येथील सपोनि घूगे, पो उप नी गोलवाल, पोलीस अंमलदार सानप, पठाण, धोंडे, ढकणे व खांडेकर यांनी केली आहे.

## धम्म रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रवचनांनी उजळणार ६९ वा धम्मचक्र दिन

**बीड । प्रतिनिधी**

**सम्यक संबुद्ध गौतम बुद्धांचे मानवी तत्वज्ञान लोकांपर्यंत जावे यासाठी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या विद्यमाने आयोजित अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषदेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे बौद्ध उपासक-उपासिका,आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव तथा परिषदेचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले.**

बीड तालुक्यातील महाविहार धम्मभूमी डॉ.भदंत आनंद कौसल्यायन नगर,शिवणी ता. जि. बीड येथे गुरुवार दि.२ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषद आयोजित करण्यात आली आहे. त्याची माहिती देण्यासाठी तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय येथे मंगळवारी दि.३० सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी धम्मपरिषदेची माहिती देताना भिक्खु धम्मशील थेरो बोलत होते. यावेळी प्रा.प्रदिप रोडे, भास्कर सरपते, इंजि. वसंत तरकसे आदी उपस्थित होते. यावेळी ते म्हणाले की, सम्यक संबुद्ध सिध्दार्थ गौतम बुद्ध यांनी, जगाला प्रज्ञा, शिल,करुणा याची शिकवण दिली. भारतीय संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर याठिकाणी आम्हाला बौद्ध धम्म दिला.त्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाला आज ६९ वर्ष पूर्ण होत आहेत. धम्माचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी ही बौद्ध धम्मपरिषद होत आहे. असे भिक्खु धम्मशील थेरो यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या धम्मपरिषदेला धम्म परिषदेचे अध्यक्ष भदंत डॉ.इंदवंस्स महाथेरो, उदघाटक भदंत डॉ.खेमधम्मो महाथेरो, प्रमुख मार्गदर्शक भिक्खु उपगुप्त महाथेरो, स्वागताध्यक्ष इंजि. अशोक येरेकर, विशेष अतिथी गोल्डमॅन डॉ.रोहित पिसाळ, प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, एसपी नवनीत कॉवत, प्र कुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, आयुक्त प्रदिप भोगले, समाज कल्याण सहसंचालक डी. बी.क्षीरसागर, उपायुक्त उमेश सोनवणे, शास्त्रज्ञ डॉ.सिध्दार्थ जोंधळे, प्रमुख धम्मदेसना भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु महाविरो थेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु धम्मघोष, भिक्खु चंद्रमुनी, भिक्खु धम्मप्रिय, भिक्खु पय्यावर्धन, भन्ते बुद्धबोधी आदींची उपस्थिती असणार आहे.

## पान ६ वरून...

### नारायणगडच्या विजयी दसरा

रेकॉर्ड ब्रेक झाला. दरम्यान यंदाच्या वर्षी नारायणगडावर दसरा मेळाव्यासाठी घोषणा होवून संस्थान च्या वतीने आणि स्वयंसेवक भाविक भक्तांच्या वतीने जोरदार तयारी करण्यात येत आहे. त्यामुळे आता या दसरा मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नारायण गडावर यंदाच्या वर्षीचा आझाद मैदानावरील उपोषणाने हैदराबाद, सातारा गॅझेट अंमलबजावणी नंतर आनंदाचे वातावरण आहे तरी दसरा मेळाव्याचे आयोजन संदर्भात स्वंयसेवक आणि समन्वय समितीच्या वतीने बैठका चर्चासत्र घेवून दसरा मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून दसरा मेळाव्याची तयारी पाहणी करण्यासाठी समाजबांधव गडावर दाखल होवून हातभार लावत आहे. यामुळे या दसरा मेळाव्यात मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासह अतिवृष्टी पाऊसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात, ओला दुष्काळ, जाहीर करण्याची मागणीचा इशारा करतात की नाही आदी विषयांवर बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे लक्ष केंद्रित होणार आहे.

--------------

### आपला दसरा, आपली परंपरा.. भगवान

ऐकण्यासाठी सर्वांनी मोठया संख्येने मेळाव्यास उपस्थित रहावे असे आवाहन सावरगांव घाट ग्रामस्थांनी केले आहे. येत्या २ ऑक्टोबर रोजी दसरा आहे, त्या अनुषंगाने 'आपला दसरा, आपली परंपरा' जपण्यासाठी संपूर्ण सावरगांव नगरी झाली असून सर्व ग्रामस्थ एकजुटीने कामाला लागले आहेत. मेळाव्याच्या तयारीसाठी कार्यकर्त्यांच्या राज्यभरात ठिक ठिकाणी बैठका पार पडल्या आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी दसरा मेळाव्याची परंपरा सुरू केली होती ती परंपरा पुढे ना. पंकजाताई मुंडे यांनी अखंडपणे सुरू ठेवली आहे. मागील दहा वर्षांपासून संत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव येथे हा दसरा मेळावा होत असून त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने याठिकाणी संत भगवान बाबा यांचे भव्य दिव्य स्मारक उभारून परिसराला 'भगवान भक्तीगड' असे नांव दिलेले आहे.

----------

### सरपंच परिवंत गायकवाड

मंजुर केले आहे.या ५० लाख रु च्या निधी मंजुरीसाठी लोकप्रिय आ.सुरेश धस यांचे मोठे सहकार्य लाभलेले आहे असे सरपंच परिवंत गायकवाड यांनी सांगितले. विविध विकास योजना दर्जेदारपणे राबविल्याने ग्रामपंचायत सदस्य जालींदर हौसराव खांडवे,आप्पासाहेब नागरगोजे,शुभम खांडवे,अशोक विधाते,अर्जुन बांगर,सुग्रीव नागरगोजे व क-हेवडगाव ग्रामस्थांनी सरपंच परिवंत गायकवाड यांचे अभिनंदन केले आहे. या गावातील युवक वर्गही सरपंच परिवंत गायकवाड यांच्यावर खुष आहेत.

--------------

### पाटोदा तालुक्यातील जवळपास सर्वच

सांगितले. परंतु जलसंधारण विभागाचे अधिकारी उदमले यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही काही प्रतिसाद मिळाला नाही. यासंदर्भात जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता लांडगे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, याविषयी आवश्यक ती माहिती घेतल्यानंतर शेतकऱ्यांची अडचण कशा पद्धतीने दूर करता येईल, यावर कार्यवाही केली जाईल. या परिसरात संपत मुळे व रामा राऊत यांच्यासह अनेक शेतकऱ्यांची शेती नदीकाठावर आहे. पाण्याचा जोरदार प्रवाह शेतात शिरल्याने जमीन व पिकांचे मोठे नुकसान होत आहे. बंधाऱ्याच्या होलमध्ये अडकलेली झाडे तातडीने काढून टाकावीत आणि यासाठी प्रशासनाने आवश्यक यंत्रणा लावून कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी संपत मुळे यांनी केली आहे माळावरच्या देवी परिसरातील हा बंधारा नेमका कधी बांधण्यात आला आहे, या बंधाऱ्याला किती पास होल आहेत आणि याची क्षमता नेमकी किती आहे-यासंदर्भात प्रशासनातील कोणतेही अधिकारी ठोसपणे सांगू शकले नाहीत. यावरूनच प्रशासनाचे आणि संबंधित विभागाचे दुर्लक्ष उघडकीस येत असून अधिकारी व प्रशासनाला या गंभीर बाबींबद्दल किती कमी चिंता आहे, हे समोर आले आहे. या बाबीवरून स्थानिक शेतकऱ्यांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

----------------

### सरकारी कामात अडथाळा

तो दोषी आढळून आला. अशा आरोपांवरून तिन्ही आरोपींच्या विरुद्ध मा.न्यायालयात कलम ३५३,३३२,५०४,५०६ भा.द.वि व मोटर वाहन अधिनियम प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकार पक्षाच्या वतीने एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले परंतु आरोपीचे वकिल, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.प्रवीण राख यांचा युक्तिवाद व उलट तपास मा. न्यायालयाने ग्राह्य धरून तिन्ही आरोपींची म्हणजेच अतुल रहाडे व इतर दोघांची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.हे प्रकरण मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.आनंद यावलकर साहेब यांचे समोर चालले . याप्रकरणी वरीष्ठ विधीज्ञ ॲड.प्रवीण भ.राख यांना ॲड.जे.एल.पठाण, ॲड.आदित्य राख, ॲड.मोहसीन तांबोळी, ॲड.राजेंद्र कोरडे, ॲड.दिनेश जाधव यांनी सहकार्य केले.

------------

### यावर्षीचा श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड

जमिनी खरडून वाहून गेलेले आहेत.सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू झालेल्या पिकांचा चिखल केला.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना ज्या माध्यमातून मदत करता येईल त्याप्रमाणे सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न माझ्याकडून करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर यंदा मच्छिंद्रनाथ गड सावरगाव येथे सालाबाद प्रमाणे होणारा दसरा मेळावा रद्द करण्याचा निर्णय देवस्थान ट्रस्टच्या वतीने घेण्यात आलेला असून विजयादशमीच्या दिवशी सकाळी साडेअकरा वाजता गडावर सुरू असलेल्या श्री मच्छिंद्रनाथांच्या समाधीच्या बांधकामाचा शिलारोहण कार्यक्रम करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष आ.सुरेश धस यांनी दिली.

----------

### मुलीवर अत्याचार प्रकरणी

यांची साक्ष व वैद्यकीय पुरावा, कागदपत्रे यावरून जिल्हा सरकारी वकील एड.अजय राख व अतिरिक्त सरकारी वकील एड.बी.एस. राख यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार आरोपीला दोषी ठरवत वीस वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आणि दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावास असी शिक्षा सुनावली. या प्रकरणात जिल्हा सरकारी वकील एड.अजय राख, तसेच अतिरिक्त सरकारी वकील बी.एस. राख यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी बाळासाहेब सानप यांनी सहकार्य केले.

------------

### श्रीकांत सानप यांनी घेतल्या

जात आहेत. जायकवाडी व तलवाडा येथे स्थलांतरित केलेल्या लोकांच्या भाजपा गेवराई विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप यांनी भेटी घेतल्या. व नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना आवश्यक त्या मदतीसाठी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे साहेब यांच्यावतीने आधार दिला. यावेळी बीड जिल्हाधिकारी श्री.विवेक जॉन्सन, तहसीलदार श्री.संदीप खोमणे, भाजपा जिल्हा सचिव श्री.सुरेश हात्ते, गेवराई तालुकाध्यक्ष श्री.सचिन दाभाडे, श्री.बाबा पिसाळ, उपाध्यक्ष श्री.बळीभाऊ कऱ्हे, श्री.रंजित शर्मा, सरचिटणीस श्री.संतोष थोरात, आदी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

------------

### डॉ.आरीफ यांच्यासारख्या अभ्यासू डॉक्टरांची

आयर्लंड, ग्रेट ब्रिटन या विश्व प्रसिद्ध संस्थेतून पोस्ट ग्रॅज्युएट एम.डीची डिग्री प्राप्त केली आहे. वैद्यकीय क्षेत्रात ही खूप मोठी उपलब्धी मानली जाते. युरोप मधील एक प्राचीन व आदरयुक्त वैद्यकीय संस्था असून ती जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त आहे. जगभरातील डॉक्टर्स या संस्थेमध्ये शिक्षण घेण्यासाठी नेहमीच प्रयत्नशिल असतात. डॉ.आरीफ हे मराठवाड्यातील सुप्रसिद्ध ज्येष्ठ विधीज्ञ मीर फरकुंद अली उस्मानी यांचे सुपुत्र आहेत. तसेच ते श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. ते सध्या सौदी अरेबिया येथे वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यांना फेलोशिप मिळाल्यामुळे अंबाजोगाई येथील हॉटेल इट ॲण्ड स्टे मध्ये गुरूवार, दिनांक २५ सप्टेंबर रोजी आयोजित विशेष सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे (माजी अध्यक्ष योगेश्वरी शिक्षण संस्था) तर प्रमुख अतिथि म्हणून जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, डॉ.शंकरराव धपाटे (अधिष्ठाता, स्वा.रा.ती.शा.रू व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई), राजकिशोर मोदी (माजी नगराध्यक्ष, अंबाजोगाई), ज्येष्ठ विधीज्ञ मीर फरकुंद अली उस्मानी, पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसभा), डॉ.सिद्धेश्वर बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. अंबाजोगाई येथील डॉ.राहुल धाकडे व मुजीब काझी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या यापुढे ही सेवा कार्पोरेटच्या हाती जाणार आहे. हा धोका वैद्यकीय क्षेत्रासाठी आव्हान समजलं पाहिजे आणि होतकरू डॉक्टरांनी हे आव्हान स्वीकारलं पाहिजे. डॉ.आरीफ यांना सल्ला देताना ते म्हणाले शिकण्यासाठी आपण जरूर विदेशात जा मात्र आपली गरज भारतात आहे, या मातीला आहे. त्या ठिकाणी पैसा मिळविणे आपणांस आव्हान नाही. मात्र भारतात राहून आपण सेवा करावी वैद्यकीय सेवेचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करावा. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.राहुल धाकडे यांनी केले तर सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मुजीब काझी यांनी मानले. या प्रसंगी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सर्वधर्मीय समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------

### आष्टी तालुक्यातील कष्टाळु शिक्षकांमुळे

रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी अंबिका लॉन्स शेरी बु. येथे अत्यंत खेळीमेळीत संपन्न झाली. प्रथम सत्राच्या अध्यक्षस्थानी आ. सुरेश धस हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. भीमराव धोंडे, शिक्षण तज्ञ पुणे डॉ. दत्तात्रय तापकीर, माजी शिक्षण सभापती उद्धवबापू दरेकर,आष्टी पं.स.चे माजी सभापती बद्रीनाथ जगताप,भाजप मंडलाध्यक्ष अनिलतात्या ढोबळे,लातुरचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे,आष्टी पं.स.च्या गटशिक्षण अधिकारी श्रीमती सीमा काळे,प्रा. निर्मलाताई तापकीर,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,प्रा.डा.विनोद ढोबळे, चेअरमन संजय गाढवे,कडा कृ.उ.बा. समितीचे सभापती रमजान तांबोळी,सरपंच संदिप खाकाळ आदि मान्यवर उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे यांनी प्रास्तविक करतांना सांगितले की, संस्थेच्या सर्व संचालक मंडळ व सभासदांच्या कार्यतत्परतेमुळे या संस्थेने ५१ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करत सुवर्ण महोत्सवी वर्षात वटवृक्षाप्रमाणे प्रगती केलेली आहे. फक्त कर्जसुविधाच नव्हे तर विमा संरक्षण, बचत प्रोत्साहन, संगणकीकृत पारदर्शक कामकाज,मोबाईल ॲप,चेकलेस बँकिंग,क्यूआर कोड सुविधा अशा आधुनिक सेवा पतसंस्थेने सभासदांना उपलब्ध करून दिल्या आहेत.आज पतसंस्थेची सभासद संख्या ९९० असून भागभांडवल २८ कोटी रु पेक्षा जास्त आहे तर ठेवींचा ५८ कोटीपर्यंत आहेत. सभासद कल्याण निधीतून मयत सभासदांच्या वारसांना ३९ लाख रुपयांची मदत करण्यात आलेली आहे.संस्था शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांतही अग्रणी असून मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान, स्वच्छ शाळा, सुंदर शाळा,गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान, आदर्श शिक्षक पुरस्कार अशा उपक्रमांद्वारे शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान आहे.यावेळी प्रमुख पाहुणे माजी आ. भीमराव धोंडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिक्षकांच्या सहकारी पतसंस्थेत तोटा होण्याचे कारणच नसते. शिक्षक हे व्यावहारिक असतात.त्यांचे आर्थिक नियोजन चांगले असते. स्वामी विवेकानंद पतसंस्थेने सामाजिक जाणीव म्हणून पुरग्रस्तांसाठी आर्थिक हातभार लावावा.आता सर्वत्र सिबीएससी पॅटर्न लागू झालेला आहे. त्याचाही अभ्यास करणे काळाची गरज आहे.मुलांनी जेवढ्या भाषा शिकू तेवढे चांगले आहे. राज्य सरकारने विद्यार्थी संख्येची अट शिथील करावी. शिक्षकांनी एक दिवसाचा पगार पुरग्रस्तांसाठी द्यावा असे अवाहन करुन पतसंस्थेच्या सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

-----------

### पुरामुळे नुकसान झालेल्या रस्ते, पुलांच्या

विभागासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी तातडीची कामे सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. काही ठिकाणी कामे सुरू असून प्रगतीपथावर असल्याचेही त्यांनी सांगितले. याआधी राज्याचे उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी नुकताच बीड विधानसभा मतदारसंघाचा पाहणी दौरा केला होता. त्यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्या निवेदनानुसार तातडीची रस्ते व पुल दुरुस्तीची कामे तत्काळ हाती घेण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार डॉ.क्षीरसागर यांची अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. बैठकीत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागासह बीड, शिरूर कासार तालुक्यातील रस्ते, पुल दुरुस्ती तसेच नवीन रस्त्यांच्या प्रस्तावांवर चर्चा झाली. यावेळी प्रभारी कार्यकारी अभियंता श्री.मोमीन, वरिष्ठ, कनिष्ठ व शाखा अभियंता उपस्थित होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची बैठक झाली. यामध्ये कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, उप कार्यकारी अभियंता चंद्रकांत बोराडे, श्री.हागवणे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, काही ठिकाणची किरकोळ दुरुस्तीची कामे पूर्णत्वास गेल्याचेही सांगण्यात आले.

**कपिलधारवाडीत संरक्षण भिंत उभारणार**

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दोन दिवसांपूर्वी कपिलधारवाडी येथे जाऊन अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती. गावात झालेले भूस्खलन लक्षात घेता रस्त्याच्या बाजूने संरक्षण भिंत उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे यांना अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले असून तो प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

------------

### कर्मचाऱ्यास मारहाण करणाऱ्या

म्हणाला तुझ्याकडे बघतो असे म्हणून त्याने आई- बहिणीवर शिवीगाळ केली. व तू ड्युटी कशी करतो बघतोच, तुला कोठे मारून टाकील हे समजणार नाही. असे म्हणाला. त्यानंतर शिंदे यांनी मला कॉलरला धरुन क्याजुल्टी वार्ड समोर नेले. यावेळी थोरात यांच्यासह अनोळखी पाच आरोपींनी काठीने लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा आशयाची फिर्याद सुकाळे यांनी बीड शहर पोलीस ठाण्यात कलम ३५३, ३३२, १४३, १४७ ,१४८ ,१४९, ५०४ ,५०६ भादवीनुसार गुन्हा दाखल झाला. आरोपीविरुद्ध आरोपत्र दाखल झाल्यानंतर प्रत्यक्ष दर्शी साक्षीदार शेख अहमद, अरुण भारती, वैद्यकीय अधिकारी गिरीष गुट्टे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन कुमार अंधारे, यांच्या साक्षी महत्वाचा ठरल्या. सबळ पुराव्यावरून न्यायमूर्ती आनंद यावलकर यांनी ईसराइल इस्माईल शेख, ज्ञानेश्वर बाबासाहेब शिंदे व संतोष वैजनाथ थोरात यांना चार वर्षे सत्ता मजुरीची शिक्षा व दोन हजार रुपये दंड ठोठावला. दंड न भरल्यास सहा महिन्याची साधी शिक्षा ठोठावली. याप्रकरणी सरकार पक्षाच्या वतीने अजय तांदळे यांनी काम पाहिले. त्यांना सहाय्यक पोलीस निरीक्षक नागमवाड व सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिमान भालेराव यांनी सहकार्य केले.

-------------

### फुलसांगवी साठवण तलाव

आपल्या काळी आईची कूस उध्वस्त झाल्याची वेदना शेतकऱ्यांच्या मनाला मोठी पीडा देणारी ठरत आहे. एकीकडे बीड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा कहर चालू असताना गेल्या आठवडाभरापर्यंत फुलसांगवी साठवण तलाव भरणे अपवाद राहिले होते. जिल्ह्यातील जिल्ह्यातील सर्व छोटे-मोठे प्रकल्प ओव्हर फ्लो होऊन नदीला नाल्यांना महापूर येत होता. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत होते. अशा परिस्थितीतही फुलसांगवी साठवण तलावाची भूक भागली नव्हती. मात्र सोमवार दि. २२ सप्टेंबरच्या रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे फुलसांगवी साठवण तलाव ओव्हर फ्लो होऊन ओसंडू लागला. याचा आनंद व्यक्त करण्या अगोदरच मंगळवार दि. २२ सप्टेंबर रोजी सिंदफणा नदीला आलेल्या महापुरामुळे शेतकऱ्यांचे हजारो हेक्टर जमीनीतील उभी पिके जमीन दोस्त होऊन शेतकऱ्याची काळी आई जात असल्याची उघडे डोळ्यांनी पाहायला मिळत होते. यामुळे प्रत्येकाच्या अंतकरणाला मोठ्या वेदना मिळत होत्या. फुलसांगवीचा साठवणसांगवीचा साठवण भरल्याचा आंनद देत असला तरी सिंदफणा गोदावरी नदीच्या पट्ट्यातील शेतकरी बांधवांचे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान हे झालेले नुकसान मनाला मोठी पीडा देणारे ठरत आहे.

----------------

## पान १ वरून...

### मागणी ओला दुष्काळाची

पुढे बोलताना म्हणाले की, पावसामुळे आणि पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर ओला दुष्काळ जाहिर करण्याची मागणी करण्यात येत आहे. आजपर्यंत ओला दुष्काळ जाहीर झालेला नाही. त्यामुळे आम्ही निर्णय घेतलाय की सर्व सवलती आता दुष्काळाप्रमाणे पुरानंतरही दिला जाईल असेही यावेळी सांगितले. पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील पूरस्थिती आणि अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मदत देण्याचे स्पष्ट केले आहे. केंद्राला एकदाच प्रस्ताव देता येतो. पण आपल्याकडे नुकसानीचा डेटा अद्याप एकत्रित झाला नाही. तसेच त्याशिवाय मदत देता येणार नाही. तसेच काही ठिकाणी निकषात केलेली मदत पुरेशी नसते असे सांगितले, यावेळी राज्यातील काही ठिकाणी कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्याबाबत विचारले असता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हा प्रकार एकाच जिल्ह्यात प्रकार घडला. या नोटीसा जून्या असल्याचेही आढळून आले. परंतु अशा परिस्थितीत कोणत्याही बँकेला वसुली करू दिली जाणार नसल्याचे सांगितले.

**कृषी विभागातील कर्मचारी देणार एक दिवसाचे वेतन - मंत्री दत्तात्रय भरणे**

अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. संकटाच्या काळात हातभार म्हणून कृषी विभागाचे राज्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये मदत म्हणून देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच त्यांनी स्वतःचे एक महिन्याचे वेतन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता मदत निधीस देण्याचे जाहीर केले आहे. एकूण २३९५९ अधिकारी आणि कर्मचारी यांचा यात समावेश आहे. या सर्वांचे मिळून एकत्रित ६ कोटी १७ लाख, ५० हजार रुपये हुन अधिक रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता मदत निधीत जमा होणार आहे.

----------

### पूरग्रस्तांच्या मदतीसाठी

आहे. याकरिता राज्यभरातील अनेक संस्थांकडून मदतीचे ओघ सुरू आहे. राज्यावर आलेल्या या संकटाला आर्थिक मदतीचा हातभार लावणं आणि त्याचबरोबर शेतकरी बांधवांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने यात एक कोटींची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री मा पंकजाताई मुंडे व मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी आज मुख्यमंत्री सहायता निधीला आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर मा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्याकडे एक कोटींचा धनादेश सुपूर्द केला.

---------------

### अतिवृष्टीत 'डीपीडीसी'चा १०

पूरस्थिती आणि गारपीट या दोन्ही बाबी उद्भवल्यास त्या जिल्ह्यात टंचाईच्या उपाययोजनांसाठी तरतूद असलेला पाच टक्के निधी मर्यादेपेक्षा कमी खर्च झाल्यास त्यातील उर्वरित शिल्लक निधी अतिवृष्टी, पूरस्थिती आणि गारपिटीच्या परिस्थितीत तातडीच्या उपाययोजनांसाठी वापरता येऊ शकेल. कोणत्याही स्थितीत खर्च करायची मर्यादा जिल्हा वार्षिक योजनेसाठी मंजूर खर्चाच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. तातडीच्या उपाययोजनांवर करण्यात येणाऱ्या खर्चाचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत मदत आणि पुनर्वसन विभागासह पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाला सादर करणे आवश्यक असेल.

**विविध कामे तातडीने करता येणार**

अतिवृष्टीच्या काळात लोकांचा शोध, स्थलांतर, मदत शिबिरातील तात्पुरत्या निवासव्यवस्थेसह अन्न, कपडे, वैद्यकीय सुविधा, हवाईमार्गाने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मदतकार्यासाठी बोटी भाडेतत्त्वावर घेणे अशा एकूण २२ प्रकारच्या कामांसाठी हा निधी वापरता येणार आहे, तर टंचाईच्या प्रसंगात तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना, तसेच दुरुस्ती, नव्या विंधन विहिरी घेणे, चारा छावण्या आणि डेपोवरील खर्च अशा ११ बाबींसाठी हा निधी वापरता येणार आहे.

----------

### नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना

दरवर्षी सुमारे ५९.१० कोटी रुपये खर्च करावे लागत होते. आता केंद्र सरकारच्या योजनेत ७५ टक्के खर्च केंद्र सरकार करते आणि २५ टक्के खर्च राज्य सरकार करते. त्यामुळे राज्य सरकारला आता फक्त २५ कोटी रुपये खर्च करावे लागतील. यामुळे राज्य सरकारचे दरवर्षी ३३ कोटी रुपयांची बचत होईल. वाचलेला हा निधी इतर शैक्षणिक कामांसाठी वापरला जाईल, असे एका अधिकाऱ्याने सांगितले आहे.

---------

### राज्यावर पुन्हा पावसाच

अंदाजासह तापमानाचा दीर्घकालीन अंदाज मंगळवारी (दि.३०) हवामानशास्त्र विभागाने जाहीर केला आहे. तर ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान दक्षिण द्विपकल्पीय प्रदेशात जसे की, तमिलनाडू, पुडुचेरी, कराईकल, आंध्र प्रदेशची आणि यनमची किनारपट्टीसह केरळ माहे आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकामध्ये दीर्घकालीन सरासरीच्या ११२ टक्के अधिक पावसाचा शक्यता वर्तवण्यात आली आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता कमी आहे. मात्र मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यासह उत्तर महाराष्ट्र आणि कोकणात काही ठिकाणी ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान अधिकच्या पावसाची शक्यता अधिक असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

---------

### यश ढाका खून

पाटोदा येथून अटक करण्यात आली आहे. दरम्यान, मंगळवारी यशचे वडील पत्रकार देवेंद्र ढाका व कुटुंबियांनी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांची भेट घेतली. भेटीनंतर ढाका म्हणाले, पोलिस अधीक्षकांनी या गुन्ह्याचा सखोल तपासाचे आश्वासन दिले असून, त्यांच्या भेटीनंतर न्याय मिळण्याचा विश्वास वाटत असल्याचे त्यांनी नमूद केले. या गुन्ह्यावेळी आरोपीसोबत असणारे, त्याला फोन करणाऱ्यांचा तपास करुन गुन्ह्यात त्यांचा आरोपी म्हणून समावेश करण्याची मागणी पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आल्याचे ढाका यांनी सांगितले.

--------

### विधान परिषद निवडणुकीसाठी

काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष एम. एम. शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

----------

### मोटार सायकल

याठिकाणी मंगळवारी दुपारी दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास दोन मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक झाली. यामध्ये बाळू शिंदे आणि नवनाथ राठोड या दोन युवकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी त्यांना तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. दोन्ही युवकांचा जागीच मृत्यू झाल्याने त्यांचे आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले असून दोन्ही युवकावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे तलवाडा व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

------------

### भगवान भक्तीगड नारायणगडासह

त्यांनी येथूनच सरकारला इशारा दिला होता. आता शासनाने आरक्षणाचा मार्ग मोकळा केला असला तरी याला ओबोसी संघटनाकडून विरोध होताना दिसत आहे. बीड जिल्ह्यात सावरगाव घाट भगवान भक्तीगड आणि नारायणगड या ठिकाणी अनुक्रमे मंत्री पंकजा मुंडे आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचे मेळावे होत असल्याने ते काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. विशेष म्हणजे एक मराठा समाजाचा आणि दुसरा वंचित ओबीसी समाजाचा मेळावा होत असल्याच्या अँगलने पाहिले जाते. या सोबतच दरवर्षी मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर या पक्षाचा मोठा दसरा मेळावा आयोजित केला जायचा. मात्र आता या पक्षाचे दोन गट पडल्यावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा दसरा मेळावा दादरमधील शिवाजी मैदानावर आयोजित केला जातो. यावेळीदेखील हा दसरा मेळावा शिवाजी मैदानावरच होणार आहे. यंदाचा दसरा मेळावा अनेक अर्थांनी वेगळा ठरण्याची शक्यता आहे. कारण या मंचावर मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याची शक्यता आहे. दोन्ही नेते युतीचीही घोषणा करू शकतात, असे सांगितले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील आपला दसरा मेळावा आयोजित करतात. आपल्या दसरा मेळाव्यात ते शिवसैनिकांना संबोधित करतात. या वर्षी त्यांचा दसरा मेळावा मुंबईतील आझाद मैदानावर होणार होता. आता मात्र त्यांच्या मेळाव्याचे ठिकाण बदलण्यात आले असून, तो यंदा आझाद मैदानाऐवजी नेस्को सेंटरमध्ये होणार आहे. एकनाथ शिंदे हेदेखील रात्री सात ते नऊ वाजेच्या दरम्यान दसरा मेळाव्यासाठी आलेल्यांना संबोधित करत असतात. संघाच्या दसरा मेळाव्यासोबतच यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे दसऱ्याच्या दिवशी संघातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व असणार आहे. तसेच नागपुरात दसऱ्याच्या दिवशी दिक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या कार्यक्रमाची देखील जय्यत तयारी चालू आहे. एकंदरीत राज्यात एकूण ५ दसरा मेळावे होत आहेत यातील बीड जिल्ह्यातील भगवानभक्ती गड आणि नारायणगड येथील मेळाव्याकडे लक्ष राहणार आहे.

## कर्जमाफी करण्याची योग्य वेळ

पाटोदा : पावसाने राज्यातील शेतकरी उध्दवस्त झाला. होत्याचं नव्हतं झालं. ५० लाख हेक्टरपेक्षा जास्त शेती पाण्यात गेली. सगळ्यात जास्त नुकसान मराठवाड्यातील शेतकर्याचं झालं. खरीप पिकचं गेल्याने शेतकर्यांसमोर जगण्याचा प्रश्न निर्माण झाला. शेतकर्याचं फक्त पीकच खराब झाले नाही तर काहींची जनावरे वाहून गेली, मरण पावली, घरात पाणी घसून संसार वाहून गेला. नदी काठची जमीन खरडून वाहून गेली.

कधी नव्हे ते एवढं मोठं नुकसान शेतकर्याचं झालेलं आहे. आधीच शेतकरी कर्जबाजारी व नापिकीमुळे त्रस्त होता. त्यात हा नुकसानीचा मोठा डोंगर उभा राहिला. राज्यातील शेतकर्यांची कर्जमाफी करावी अशी मागणी सतत केली जात होती. मात्र या मागणीकडे दुर्लक्ष केलं, मध्यंतरी मा.आ. बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी अमरण उपोषण केलं होतं. त्यांना आश्वासन दिले होते की, एक समिती स्थापन करु आणि त्या समितीची अहवाल आल्यानंतर कर्जमाफीचा निर्णय घेवू, तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, एकनाथराव शिंदे यांनी ही अनेक कार्यक्रमातून योग्य वेळ आल्यानंतर शेतकर्यांची कर्जमाफी करु असे आश्वासन दिले होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.१ ऑक्टोबर २०२५



# धोक कायम; दहा हजार नागरिकांना गावा बाहेर काढले

## प्रशासन म्हणाले घाबरू नका, आम्ही तुमच्या सोबत आहोत -जिल्हाधिकारी

गेवराई। प्रतिनिधी

पैठण नाथसागरातून सोडण्यात आलेला पाण्याचा विसर्ग आणि आभाळातून पडणारा धो धो पाऊस, अशा दुहेरी संकटात सापडलेल्या गोदाकाठच्या गावांना पुराने वेढा दिल्याने, अखेर गावकऱ्यांनी जड अंतःकरणाने गाव सोडले आहे. प्रशासनाकडून गेवराई तालुक्यातील गोदावरी कालच्याच ३२ गावातील २३०४ कुटूंबातील जवळपास नऊ हजार नागरिकांना सुखरूप हलविले आहे. त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था केली आहे. एक हजार नागरिकांनी जिल्हा परिषद शाळेचा आसरा घेतला असून, काही नागरिक आप्तेष्टांकडे राहण्यास गेली आहेत. दरम्यान, धोका कायम आहे. नाथसागरातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू असला तरी, सुदैवाने बीड जिल्ह्यातील पाऊस थांबला आहे. त्यामुळे, नागरिकांनी घाबरून जाऊ नये, प्रशासन सतर्क असून, तुमच्या सोबत आहे. असा दिलासादायक शब्द बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन पूरग्रस्त नागरीकांशी बोलताना दिला आहे.

जायकवाडी नाथसगरातून तीन लाख क्युसेस पाणी गोदावरीत सोडल्यानंतर गोदावरीला पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. मध्यरात्री गेवराई तालुक्यातील ३० ते ३५ गावातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. अनेक गावातील नागरिक महापुराच्या भीतीने रात्रभर जागेच होते. दरम्यान भयभीत झालेल्या नागरिकांचे रात्रभर स्थलांतर सुरूच होते. अनेकांना शाळेच्या ठिकाणी सुरक्षित जागेत थांबवण्यात आले. रविवारच्या रात्रीपासून नाथसगरातून तीन लाख क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. मध्यरात्री शहागडच्या पुलावर मोठा फौज फाटा तैनात होता, गेवराई तालुक्यासह बीड जिल्ह्यातील जवळपास ६० गोदाकाठच्या गावांनी रात्र जागून काढली. जस जसा पुराचा वेढा वाढत होत तसे भीतीचे वातावरण निर्माण होत होते. गावात क्षणाक्षणाला सायरन वाजवले जात होते. पाणी पातळी सांगितली जात होती. काही भागात मध्य रात्री एन डी आर एफ चे पथके तैनात करण्यात आली होते. कुरण पिंपरी पासून ढालेगावपर्यंत प्रशासन सतर्क होते. सकाळी अनेक गावांना पुराने वेढले होते. गावात आता फक्त कर्ते पुरुष राहिले आहेत. शनी महाराजांचे मंदिर पाण्यात गेले आहे. पाणी वेशीच्या आत घुसले आहे. गेवराई तालुक्यातील अनेक गावांना जोडणारे बहुतांश रस्ते पाण्याखाली गेले आहेत. गेवराई तालुक्यातील सुमारे ३० ते ३५ गावांना पुराचा धोका निर्माण झाला होता. रात्री प्रशासनाने तातडीने काही नागरिकांचे स्थलांतर केले होते. यामध्ये सावळेश्वर, पांचाळेश्वर, बोरगाव, गुळज, नागझरी, आगर नांदूर, हिंगणगाव, गोंदी, कटचिंचोली, पांगुळगाव, मिरगाव, काठोडा, राजापूर, गंगावाडी, रामपुरी, गोपत पिंपळगाव, श्रीपत अंतरवाला यासह अनेक गावांचा समावेश होता.


**स्थलांतरित नागरिकांची व्यवस्था :** गोदी खुर्द - नागरिकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व विठ्ठल मंदिर येथे सोय करण्यात आली आहे.,गुळज - भगवाननगर येथील जिल्हा परिषद शाळेत व्यवस्था केली. नागझरी (रेवकी महसूल मंडळ) - नागरिकांना जायकवाडी वसाहतीतील भगवान बाबा माध्यमिक विद्यालयात नेण्यात आले., सावळेश्वर - जिनिंग येथे लोकांना थांबवले आहे., संगम जळगाव - नागरिकांना खंडूबाबा माध्यमिक विद्यालय, रेवकी येथे स्थलांतरित., भोगलगाव, गंगावाडी (राहेरी) - नागरिकांना तलवाडा येथील शाळेत हलवले आहे., जुने बोरगाव बु. - नागरिकांसाठी बोरगाव जिल्हा परिषद शाळा व बरड बोरगाव शाळा येथे सोय., हिंगणगाव - सध्या परिस्थिती सामान्य असून ४ ते ५ कुटुंबांनी नातेवाईकांकडे स्थलांतर केले आहे., संगम जळगाव - गावातील गुरेढोरे सुरक्षित स्थळी हलवली असून परिस्थिती नियंत्रणात आहे. परंतु स्थिती बिकट झाल्यास रेवकी येथील शाळेत अतिरिक्त सोय ठेवण्यात येणार आहे.

### प्रशासन सतर्क आहे

पूरस्थिती हाताळण्यासाठी एनडीआरएफच्या टीम सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. गावागावात प्रशासन सतर्क असून नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. गोदाकाठच्या गावांमध्ये वाढत्या पाण्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असले तरी प्रशासन रात्रंदिवस युद्धपातळीवर मदत व बचाव कार्य करत असल्याचे दिसत आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी नागरिकांना सुरक्षित ठेवण्यात आले आहे. अशा सर्व ठिकाणी प्रशासन, सामाजिक कार्यकर्ते, विद्यमान आमदार विजयसिंह पंडित, माजी मंत्री बदामराव पंडित, युवा नेते बाळराजे पवार यांच्या वतीने सोयी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. नागरिकांना जेवणाची सोय उपलब्ध करून दिली जाणार आहे. या संदर्भात तत्परता दाखविली जात असून, काही अडचण आल्यास, गाव पातळीवरच्या कार्यकर्त्यांना, प्रशासनाला स्पष्ट सांगावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## थोडक्यात



### आ. सुरेश धस यांच्या हस्ते श्रृंगेरी देवीची आरती

आष्टी : नवरात्री हा देवी उपासनेचा पवित्र उत्सव म्हणजे स्त्रीशक्तीचा जागर आणि श्रद्धा, सत्त्व व संस्कारांचा संगम आहे. या पावन परंपरेला सन्मान देत आमदार सुरेश धस यांनी ब्रम्हगाव येथील श्रृंगेरी देवीच्या सातव्या माळेच्या निमित्ताने उपस्थित राहून देवीची मनोभावे आरती केली.

या प्रसंगी आमदार सुरेश धस यांनी उपस्थित भाविकांशी संवाद साधत सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. देवस्थान ट्रस्टतर्फे आमदार धस यांचा सन्मान करण्यात आला. नवरात्रीच्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्यास यावेळी सरपंच रोहिदास पवार,भाऊसाहेब निंबाळकर, ट्रस्ट अध्यक्ष फौजी विजय हराळ,पुजारी मारुती सानप,भाऊसाहेब पवार, उपसरपंच सचिन हराळ,डॉ.संदीप सानप,शिवाजी सानप,संजय हराळ,सतीष पवार,मारुती बबन पवार,मुकेश आगलावे, नवनाथ नवसुपे,राहुल जमदाडे, साहेबराव वायकर,कल्याण निंबाळकर, गौरव निंबाळकर, बाळू गवारे,बाबू गवारे,अंबादास पवार,संभाजी हराळ यांच्यासह भाविक भक्तमंडळी, ग्रामस्थ तसेच महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोठेवाडी शाळेत शिक्षकांच्या बदलीने विद्यार्थी भावुक

माजलगाव: तालुक्यातील मोठेवाडी जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेतील शिक्षकांची बदली झाल्यामुळे संपूर्ण शाळेत भावनिक वातावरण निर्माण झाले होते. बदली झालेल्या शिक्षकांचा व नवीन आलेल्या शिक्षकांचा ग्रामपंचायत व उपस्थित ग्रामस्थांनी



दि.२२ सप्टेंबर सोमवार रोजी सत्कार केला. शिक्षक संतोष जगताप,अंजली तांदळे, मधुकर वाघमारे, राजेभाऊ सोगे, लक्ष्मीनारायण परदेशी यांची बदली झाली.तर शिक्षक गेणु पवार, सतीष डोणे,वसंत टाकणखार,शिवाजी व्यव्हारे, शिक्षिका रूपाली बडवे,मनिषा गुळवे हे नव्याने रूजू झाले आहेत. शिक्षकांच्या बदलीने विद्यार्थी भावुक झाले होते.काही शिक्षकांची दुसऱ्या शाळेत बदली झाली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील अतूट नातं यावेळी प्रकर्षाने जाणवलं. सर, तुम्ही जाऊ नका! असा एकच गजर विद्यार्थ्यांनी केला. स्वतः शिक्षकांच्याही डोळ्यात पाणी आले होते.गेल्या सात वर्षापासून विद्यार्थ्यांच्या मनात घर केलेल्या या शिक्षकांचा निरोप घेताना संपुर्ण शाळेतील वातावरण भावुक झाले होते. या सत्कार प्रसंगी सरपंच सत्यभामा दळवी,माजी सरपंच अविनाश गोंडे, उपसरपंच अंगद खेत्री,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिंधु नाथा रासवे,उपाध्यक्ष विलास खेत्री, मुख्याध्यापक तुकाराम शिंदे, संभाजी पास्टे,सुदर्शन हिवकर,जगन्नाथ खेत्री,भगवान पवार,प्रभाकर खेत्री,शिक्षक उत्तमराव ढवळे, रावसाहेब राठोड, संजय रोकडे यांच्या सह विद्यार्थी, विद्यार्थिनी व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## आ. विजयसिंह व अमरसिंह पंडित पुरग्रस्तांच्या मदतीला सरसावले

गेवराई। प्रतिनिधी

जायकवाडी धरणातून अतिरिक्त पाणी सोडल्यामुळे गोदावरी नदीकाठावर गंभीर पुर परिस्थिती निर्माण झाली, गेवराई विधानसभा मतदार संघातील चाळीस गावांमध्ये त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. प्रशासनाकडुन या बाबतची माहिती मिळताच माजी आमदार अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदीकाठच्या गावांना भेटी देवुन संभाव्य पुर परिस्थितीला सामोरे जाण्याची तयारी केली. शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातुन रामपुरी, तलवाडा, दैठण, मालेगांव यासह आदी ठिकाणी मदत केंद्र सुरु केले. शारदा प्रतिष्ठानच्या मदत केंद्रांमध्ये पुरग्रस्त नागरीकांची निवास आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली. दोन दिवसात सुमारे दहा हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था शारदा प्रतिष्ठान कडुन करण्यात आली. आ. विजयसिंह पंडित यांनी टाकरवण भागातील गावांना तर माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी बोरगांव पासुन खामगांव पर्यंतच्या पुरग्रस्त गावांना भेटी देवुन नागरीकांशी संवाद साधला.



जायकवाडी धरणातुन रविवार दि. २८ सप्टेंबर रोजी सुमारे तीन लाख क्युसेस पेक्षा जास्तिचे पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात आले. गोदावरी नदी काठावरील अनेक गावांमध्ये पुराचे पाणी गेल्यामुळे या भागातील जनजीवन विस्कळीत झाले. पुरग्रस्त भागातील लोकांना गावाच्या बाहेर सुरक्षितस्थळी काढण्यासाठी प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावुन शिवछत्र परिवार रात्रीचा दिवस करुन झटत होता. रात्री उशिरा पर्यंत हे काम सुरु होते. सन २००६ नंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यात आले होते. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित आणि संपुर्ण शिवछत्र परिवार पुरग्रस्तांच्या मदतीसाठी झटत आहे. शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातुन तात्काळ रामपुरी, तलवाडा, दैठण आणि मालेगांव येथे मदत केंद्र स्थापन करुन तेथे पुरग्रस्त नागरीकांच्या निवास आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली. रविवारी रात्री उशिरापर्यंत सुमारे दोन हजार हुन अधिक नागरीक या मदत केंद्रात दाखल झाले होते.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी सोमवार दि. २९ रोजी सकाळी गोदावरी नदीकाठी बोरगांव, गुंतेगांव, पाथरवाला, गुळज, सुरळेगांव आदी ठिकाणी भेटी देवुन पुरग्रस्त नागरीकांची अस्थेवाईकपणे चौकशी केली. शिवछत्र परिवाराच्या माध्यमातुन संकटकाळी होत असलेल्या मदतीच्या अनुषंगाने पुरग्रस्त नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## गंगामसला गावात पूरग्रस्तांना दिलासा



माजलगाव। प्रतिनिधी

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पूरस्थिती निर्माण झाली आहे.बीड जिल्ह्यालाही त्याचा मोठा फटका बसला आहे.पैठण येथील नाथसागर धरण व माजलगाव धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आल्यानंतर बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील गंगामसला गावासह अनेक गावांत पूरस्थिती निर्माण झाली.गंगामसला येथे अनेक कुटुंबांच्या घरामध्ये पाणी घुसल्यामुळे जीवनावश्यक साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर स्व. गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठान,महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्त बांधवांना अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले.संकटाच्या काळात पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या या मदतीमुळे पूरग्रस्तांना दिलासा मिळाला आहे.बीड जिल्ह्यातील शेतीचे झालेले नुकसान कल्पने पलीकडेचे आहे व पुरामुळे अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त झालेले आहेत अनेक कुटुंब उघडच्यावर आले आहेत.यासाठी जिल्ह्याच कायम पालकत्व स्वीकारलेल्या नामदार पंकजा मुंडे प्रशासनाकडून मदत मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेतच याशिवाय तात्काळ मदतीसाठी स्व. गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून पूराग्रस्तांच्या कुटुंबांना अन्नधान्य किट वाटप करून या कुटुंबाची प्राथमिक गरज पूर्ण करणे आवश्यक आहे या भावनेतून नामदार पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्तांना जिल्ह्यामध्ये प्रतिष्ठानच्या वतीने मदत कार्य चालू आहे. माजलगाव तालुक्यात गंगामसला येथे स्व.गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठान यांच्या वतीने अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. यावेळी माजलगाव तालुकाध्यक्षा सौ. रूपाली कचरे, तालुकाध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके, शहर मंडलाध्यक्ष विनायक रत्नपारखी, सरचिटणीस प्रदीप जाधवर,युवा नेते शरद कचरे,माजी सरपंच बाळासाहेब सोळंके,ग्रामविकास अधिकारी मानकर, यांच्यासह ड.हरिहर सोळंके, बाळासाहेब मधुकर सोळंके,रुस्तुम शिंदे,माजी चेअरमन प्रकाश सोळंके,माजी सभापती एन.टी. सोळंके,शंकरराव सोळंके,जगन्नाथराव डाके आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात ४० वर्षांपूर्वी काही शिक्षकांनी एकत्र येऊन आपल्या शिक्षक बांधवांची बचत तथा अडचणीच्या काळासाठी मदत व्हावी या उद्देशाने निर्माण केलेल्या स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २८ रोजी सर्व सभासद शिक्षकांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाली. स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभा ही माजी केंद्र प्रमुख रामरावजी मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.तर प्रमुख अतिथी शिक्षक नेते चंद्रकांत साबळे , बबनराव घुले सर, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष,सामाजिक कार्यकर्ते विजय रापतवार, केंद्रीय मुख्याध्यापक आवाड रामराजा ,केंद्र प्रमुख फारुख मनियार , शिक्षक नेते दयाराम दराडे, नवनिर्वाचित अध्यक्ष, सचिव , उपाध्यक्ष ,कोषाध्यक्ष व अन्य संचालक मंडळ व सभासद उपस्थित होते.

याप्रसंगी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी मागील काळात संस्थेत झालेल्या अपहाराची न्यायालयीन चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासाठी आम्ही तुमच्या सोबत आहोत असा शब्द दिला. मागील काळात या पतसंस्थेमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे कायद्याने सिद्ध झाले आहे. सन २०१२ ते २०१७ चे संचालक मंडळ व २००१ ते २०१२ या दरम्यान पदाधिकारी, बँक अधिकारी कर्मचारी , संस्था कर्मचारी यांनी संगनमताने केलेला आहे . जे कोणीही या अफरातफर करण्यात दोषी आढळेल त्यांना कायद्याने शिक्षा होऊन आपल्या पतसंस्थेची कर्जवसुली झाली पाहिजे .ज्या सभासदा कडे संस्थेचे कर्ज आहे त्यांनी लवकरात लवकर भरून सहकार्य करावे,जेणेकरून गेल्या चार ते पाच वर्षांपासून सेवानिवृत्त झालेल्या सभासदांना त्यांच्या भाग भांडवलाची रक्कम परत देता येईल. त्यामुळे पतसंस्थेचे व्यवहार सुरळीत चालू होतील असेही सांगितले तसेच एक रकमी कर्ज भरणाऱ्या सभासदांना व्याजात सुट द्या अशी मागणीही यावेळी केली. या सभेप्रसंगी श्रीमती टिळेकर मॅडम यांनी मला बोगस बँक भरणा पावती देऊन फसवणूक कशी केली व कोणी केली हे नावासहीत सांगितले. भारत शेरेकर यांनी सर्व सभासद बांधवानी आपनाकडे थकीत राहीलेली रक्कम असेल तर तात्काळ भरावी असे अवाहन केले. दयाराम दराडे यांनी संस्थेचा लेखापरीक्षण पर्यंतचा प्रवास सांगितला .अध्यक्ष,सचिव यांनी सर्व सभासद यांनी विचारलेल्या प्रश्नांना सकारात्मक उत्तर दिली. कोषाध्यक्ष उमाप संजिव कचरू यांनी आजच्या बैठकीत घेण्यात येणारे ठरावाचे उपस्थित समोर वाचन केले .या कार्यक्रमाचे बहारदार संचलन शिक्षक नेते, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे सचिव विष्णू सरवदे यांनी केले तर आभार नवनिर्वाचित संचालक पुरी सर यांनी मानले. सभेसाठी १५० सभासद उपस्थित होते.

### आजिनाथ शेरकर यांना राज्य पुरस्कार

नाशिर्क। प्रतिनिधी

पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी वतीने क्रांतीज्योती व क्रांतीसुर्य शिक्षक प्रेरणा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन . करण्यात आले होते दिनांक २८ सप्टेंबर २०२५ परशुराम सायखेडकर नाट्यमंदिर. शालिमार नाशिक येथे पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी नाशिक तर्फे क्रांतीज्योती व क्रांती सूर्य शिक्षक प्रेरणा पुरस्कार सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे उद्घाटक किरण लोखंडे, संपादक दैनिक पुण्यनगरी , कार्यक्रमाचे अध्यक्ष नितीनजी ठाकरे, सरचिटणीस मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक हे होते.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर का, जि. बीड**

Email.tahsildarshirerkasar@gmail.com

क्र. २०२५/विलंब जन्म नोंग/कावि (२४६४८२८)

दुरध्वनी क्रमांक ०२४४४-२५१३५९

**विलंब जन्म नोंद जाहीर प्रगटन**

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का, यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नॉचणी (सुधारणा) कायदा २०२३ चे कलम ११ (२) व ३ अन्वये दाखल प्रवारणात जन्म नोंद घेणे बावत योग्य अर्थी अर्जदार, लक्ष्मण अर्जुन शिंगटे, रा. नारायणवाडी, ता. शिरूर कासार, जि. यीड यांनी स्वतःच्या मुलीचा जन्म दिनांक ०५/११/२००९ रोजी नारायणवाडी, ता. शिरूर का. जि. बीड येथे झाल्याचा बिलंच जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत था न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. (कालेकी लक्ष्मण शिंग) त्या अर्थी मा जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा, अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून नियमानुसार अर्जाची सुनावणी घेउन विलंबाने जन्म नोंद घेणे बाबत आदेश केला जाईल.

स्वाक्षरित
**दंडाधिकारी**
शिरूर कासार

**टीसी हरवला आहे**

टी.सी.हरवला आहेङ्गवरपे लक्ष्मण रामचंद्र, मु.पो.अंमळनेर ता.पाटोदा जि.बीड या नावाचा बी.ए.प्रथम वर्षाचा टी.सी.बीड-पुणे बस प्रवासात दि.०१/०७/२०२५ रोजी हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क**
**९६०४४१८१७९**

**टीसी हरवला आहे**

आश्लेषा राहुल कांबळे रा.शारदा नगर अंबड हिची इयत्ता ६ वी ची जैन इंग्लीश स्कूल अंबड ची टि.सी. अंबड बस स्थानक परिसरात हरवली आहे. सापडल्यास क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क**
**७७१९०४०१८०**

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५७०**
**दिनांक -१९/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अश्विनी कैलास चव्हाण रा. मसई ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | अश्विनी कैलास चव्हाण | स्वतः | ०१/१०/२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

राज्य लोकतंत्र

शेत-शिवार

बुधवार दि.१ ऑक्टोबर २०२५

४

# पुराच्या तडाख्यानंतर बळीराज्यापुढं पुराव्यांचे संकट

## शेतकऱ्यांना बँकेत जाऊन केवायसी करून ओळख पटवून देणे आवश्यकच!

राज्यातील बहुतांश भागात गेल्या आठवड्यात झालेल्या पावसाने अक्षरशः झोडपून काढलं आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका मराठवाड्यातील ( ) शेतकऱ्यांना बसला असून हातातोंडाशी आलेलं उभं पीक जमीनदोस्त झालं आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या बळीराज्याल आता आर्थिक मदतीची गरज आहे. सध्या पावसाने काहीशी विश्रांती घेतली असली तरी आता शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या नुकसान भरपाईसाठीच्या पुराव्यांचे संकट भेडसावत आहे. तर नुकसान भरपाईची रक्कम मिळविण्यासाठी पंचनामा केल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्याने बँकेत जाऊन 'केवायसी' करून ओळख पटवून देणे आवश्यक आहे. अशी माहिती छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिली आहे. तर बँकांच्या पडताळणीनंतरच शेतक ऱ्यांना मदत देण्याचे संकेतही त्यांनी यावेळी दिले आहे.



राज्यासह मराठवाड्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाली आहे. तर पुरामुळे संकटात सापडलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून १५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी प्राप्त झाला असल्याची माहिती आहे. तरी ही रक्कम मिळविण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने बँकेत जाऊन 'केवायसी' करून ओळख पटवून देणे आवश्यक असल्याची माहिती विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिली आहे. तर पंचनामा केल्यानंतर रक्कम मिळवण्यासाठी 'केवायसी' करणे आवश्यक असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

महापुरानंतर कशी घ्याल पिकांची काळजी?

पाऊस ओसरल्यानंतर शेतात पाणी साचले आहे. यामुळे पिकांमध्ये रोगराई पसरण्याची शक्यता आहे. यावर नवीन बुरशीनाशके फवारणे आवश्यक आहे. बांधबंदीची दुरुस्ती करणे आणि नवीन खतांचा वापर करून शेती पूर्ववत आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. खूप जास्त पाण्याच्या प्रवाहामुळे मातीसह पिके वाहून गेली आहेत. ज्या ठिकाणी सोयाबीन आणि उशिरा पेरलेल्या कापसासारख्या पिकांना वाचवता येईल, त्या पद्धतीने काळजी घेणे गरजेचे आहे. कापसातील बीट राहिलेले बोंड पिकींग करता येतील. बाजारात उपलब्ध असलेले फवारणीसाठी वापरले जाऊ शकते. ''जे पीक लोरलंय त्या पिकाच्या बाबतीमध्ये आपल्याला गेलं असं समजण्यात काही हरकत नाही.'' याचा अर्थ पूर्णपणे पाण्याखाली गेलेल्या पिकांबद्दल आशा सोडून, वाचलेल्या पिकांवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. शेतीत साचलेले पाणी काढून टाकणे हे पहिले पाऊल आहे.

# मडका पद्धतीने मशरूम उत्पादन





महाराष्ट्रात शेतकरी अलीकडे मोठ्या प्रमाणात मशरूम शेतीकडे वळत आहेत. मुख्य म्हणजे सध्या अनेक पिकांना योग्य तो बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी अन्य पर्यायांचा अवलंब करत आहेत. विशेष म्हणजे मशरूम उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या जागेची आवश्यकता नसते. अगदी छोट्याशा जागेतही शेतकरी मोठ्या प्रमाणात मशरूमचे उत्पादन घेऊ शकतात. ज्यामुळे त्यांना अधिकचे उत्पन्न मिळण्यास मदत होते.

काय आहे मडका पद्धती? : महाराष्ट्रासह देशभरात सध्या मशरूमची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यापूर्वी केवळ शहरी भागांमध्ये मशरूमला मागणी होती. मात्र, गेल्या काही दिवसांत ग्रामीण भागात देखील मशरूमची भाजी विशेष प्रसिद्ध झाली आहे. मडका पद्धतीने मशरूम उत्पादन घेण्यासाठी सर्वसाधारणपणे ३५ ते ४० दिवसांचा कालावधी लागतो. मशरूम उत्पादन घेण्यासाठी मडक्याला छिद्रे पाडले जातात. त्यास कापूस लावून बंद केले जाते. तसेच त्याच्या तोंडाला प्लास्टिकची पिशवी बांधली जाते. मडक्यावर दिवसातून दोन ते तीन वेळा पाणी टाकले जाते. काही दिवसांनी या छिद्रांमधून कापूस बोळे काढून घेतले जाते. त्यानंतर मडके मशरूम बियाण्याचा रोपणासाठी तयार होते. मडक्यावर रोपण केल्यानंतर ७ ते ८ दिवसांनी मशरूमच्या कळ्या दिसायला सुरुवात होते. त्यानंतर मशरूमवर नियमित पाणी शिंपडणे आवश्यक असते. याशिवाय मशरूम उत्पादनासाठी या कालावधीत दररोज कमीत कमी ४ ते ५ तास मशरूमला ट्यूबलाईटचा प्रकाश मिळणे आवश्यक असते. तसेच आपण तयार केलेल्या शेडमध्ये ७५ ते ८० आर्द्रता असणे आवश्यक असते.

किती मिळते उत्पादन? : मडका पद्धतींने मशरूम उत्पादन घेण्यासाठी ३५ ते ४० दिवसांचा कालावधी लागतो. एका मडक्यापासून साधारणपणे एक किलोपर्यंत मशरूम मिळते. तर सर्वसाधारणे पद्धतीने त्याच ठिकाणी शेतकऱ्यांना ५०० ते ९०० ग्रॅमपर्यंत मशरूम मिळते. मडका पद्धतीमध्ये मशरूम उत्पादन घेताना दोन बॅचमध्ये जवळपास १० ते १५ दिवसांचा कालावधी ठेवला जातो. या पद्धतीत मशरूम काढणीनंतर, प्लास्टिक पिशव्यांमध्ये बांधून थेट बाजारात विक्रीसाठी पाठवला जाऊ शकतो. किंवा मग मशरूम वाळवला देखील जाऊ शकतो. यासाठी तो कपडयात बांधून उन्हात वाळवण्यासाठी ठेवावा लागतो.

# दुभत्या जनावरांसाठी असा तयार करा मुरघास

आपल्याकडे फक्त पावसाळ्याच्या ३ ते ४ महिन्यातच हिरवा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध होतो. पण बाकीच्या ८ ते ९ महिने हिरव्या चाऱ्याची कमतरता भासते. या अडचणीवर मुरघास हा रामबाण उपाय आहे. मका, ज्वारी इत्यादी अशा एकदल पिकांच्या हिरव्या चाऱ्यापासून मूरघास करता येतो. मूरघास तयार करायला सोपा असतो आणि कमी खर्चात तो बनतो.

मूरघास तयार करण्याची पद्धत : मक्याचे पीक पोटरीवर येऊन दाणे दुधाळ असताना कापावे. तर ज्वारी किंवा बाजरीचे पीक फुलोऱ्यावर असताना कापावे. कापलेल्या पिकाचा कुट्टी यंत्राच्या सहाय्याने चाऱ्याची कुट्टी करून खड्ड्यामध्ये भरावी. खड्डा भरत असताना वरून दाब देत रहावा. त्यामुळे खड्ड्यात हवा भरणार नाही. खड्ड्यामध्ये हवा राहिल्यास चारा कुजण्याची शक्यता असते. चांगल्या प्रतीचा मूरघास तयार करण्याकरीता कुट्टी केलेल्या चाऱ्यावर त्याच्या प्रमाणाच्या १ ते १.५ टक्के गुळाचे पाणी, आणि १ टक्का युरिया पाण्यात मिसळून फवारावा. खड्डा पूर्ण भरल्यानंतर खड्ड्याच्या वरच्या भागावर १ ते २ फूट उंच वैरणीचा निमूळता ढीग करावा आणि त्यावर गवत किंवा कडब्याच्या पेंढ्याचा थर पसरावा. त्यानंतर शेण व चिखल यांच्या मिश्रणाचा थर देऊन खड्डा झाकून टाकावा. या खड्ड्यावर पॉलिथिन पेपर म्हणजेच प्लास्टिकचा पेपर अंथरण्यास हरकत नाही. मूरघास तयार होण्यास ४५ ते ६० दिवसांचा कालावधी लागतो. त्यानंतर खड्ड्याच्या तोंडास थोडेसे भोक पाडून त्यातून रोज मूरघास काढून घ्यावा. मूरघास काढून घेतल्यानंतर त्यावर वाळलेले गवत वगैरे घालून तोंड बंद करावे. दुभत्या जनावरास दररोज १० ते १५ किलो मूरघास खाऊ घालावा. मूरघास हा आंबट गोड चारा असतो. त्यामुळे जनावरे तो आवडीने खातात. पावसाळी हंगामात जादा असलेल्या ओल्या वैरणीचा मूरघास तयार करून तुटीच्या काळात दुभत्या जनावरांना तो खाऊ घालावा.

हिरवा चारा कमी असताना मुरघास हा उत्तम पर्याय आहे. मका दाणे दुधाळ अवस्थेत किंवा ज्वारी फुलोऱ्यावर असताना कापून कुट्टी करावी. कुट्टी खड्ड्यात भरताना हवा राहू नये म्हणून दाबून भरावे. गुळाचे पाणी (१-१.५%) + युरिया (१%) मिसळून फवारल्यास चांगल्या प्रतीचा मुरघास तयार होतो.

४५-६० दिवसांनी वापरता येतो; दुभत्या जनावरास रोज १०-१५ किलो मुरघास द्यावा.



# आंत्रविषार : शेळ्या, मेंढ्यांमधील प्राणघातक आजार



.आंत्रविषार हा जिवाणूजन्य आजार आहे. या आजारात विष तयार झाल्यामुळे आतड्यांच्या दाह होतो. त्यामुळे मृत्यू होतो. ईटीव्ही लस मॉन्सूनपूर्व म्हणजे १५ जूनपर्यंत आणि मॉन्सूननंतर ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांत दरवर्षी घ्यावी. पावसाळी वातावरणात अचानक बदल होऊन आर्द्रता, दमटपणा वाढतो. या वातावरणामध्ये शेळया, मेंढ्यांना आंत्रविषार आजार होतो. हा जिवाणूजन्य आजार आहे. आंत्रविषार आजाराचे जिवाणू जनावरांच्या आतड्यात नियमित वास्तव्यास असतात, परंतु ते कमी प्रमाणात विष तयार करीत असल्याने शेळ्या मेंढयांमध्ये आजार उत्पन्न करू शकत नाही. परंतु जिवाणूला पोषक वातावरण मिळाल्यास रोगकरकांची उत्पत्ती अधिक प्रमाणात होऊन अधिक प्रमाणात विष उत्पन्न होऊन शेळी, मेंढीचा मृत्यू होतो. दोन आठवड्यांपासून ते मोठ्या वयोगटातील शेळ्या, मेंढ्यांना हा आजार होऊ शकतो. परंतु करडांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे. निरोगी, धष्टपुष्ट कोकरू, करडे यास अधिक प्रमाणात बळी पडतात. बहुतेक वेळा हा आजार अतितीव्र स्वरूपाचा असल्याने लक्षणे लक्षात येण्याअगोदरच बाधित शेळी, मेंढीचा मृत्यू होतो.

आजाराची कारणे : हा आजार जिवाणूमुळे होतो. शेळ्या, मेंढ्यांच्या आहारामध्ये अचानक बदल. आहारात जास्त प्रमाणात पिष्टमय, कार्बोदकयुक्त खाद्य उदा. मका, गहू, ज्वारी इत्यादी खाण्यात येणे. पावसाळ्यात उगवलेले हिरवे गवत खूप प्रमाणात जनावरांनी खाल्ले, तर या आजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो. हिरवा चारा अधिक प्रमाणात खाल्ल्यामुळे जनावरांचे पोट गच्च होते. अंशतः पचलेल्या अन्नामुळे आतड्यांमध्ये जिवाणूद्वारे अधिक प्रमाणात विष तयार होते.

आतड्यात मोठ्या प्रमाणात न पचलेले किंवा अंशतः पचलेले अन्न असणे. आतड्यामध्ये पट्टकृमीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव. प्रतिकारशक्तीचा नैसर्गिक अभाव. लहान कोकरू, कराडांना जास्त दूध पाजणे.

असा होतो आजार : बहुतेक शेळ्या-मेंढ्यांच्या आतड्यात क्लॉस्ट्रिडियम परफ्रिंजन्स हा जिवाणू कमी प्रमाणात नैसर्गिकरीत्या आढळून येतो. परंतु जिवाणू विष तयार करून बाधा करत नाही. जेव्हा या जिवाणूला पूरक वातावरण मिळते तेव्हा विष तयार करून जनावराला बाधा करू शकतात. आहारातील काही बदल उदा. जास्त प्रमाणात कार्बोदके युक्त खाद्य उदा. मका, गहू, ज्वारी इ. खाण्यात येणे, आतड्यात अडथडे निर्माण झाल्यास जास्त प्रमाणात न पचलेले किंवा अंशतः पचलेले अन्न जमा होणे, तसेच खूप जास्त प्रमाणात वेगाने आहार वाढला तर या जिवाणूला पूरक परिस्थिती निर्माण होते. या परिस्थितीत जिवाणूची वेगाने वाढ होते, ते शक्तिशाली विष तयार करतात. हे विष आतड्यांमधून शोषले जाते. काही तासांतच शेळ्या, मेंढ्यांचा मृत्यू होऊ शकतो.आजाराची लक्षणे : शेळ्या, मेंढ्यांचा मृत्यू अचानक होतो. प्रादुर्भाव झाल्यापासून १२ ते २४ तासांत करडांचा मृत्यू होतो. करडांना हिरव्या रंगाची पातळ हगवण होते. जिवाणूच्या विषांमुळे जनावरांच्या आतड्यांच्या दाह होतो. यामुळे हगवणीतून रक्त पडते. बाहेरून चारून आलेली जनावरे अचानक सुस्त होतात. हालचाल कमी करतात. बाधित पिले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात, अडखळत चालतात, जनावरांचा तोल जातो. मोठ्या शेळ्या-मेंढ्यांच्या तोंडातून फेस येणे, लाळ येणे, दात खाणे, श्वासोच्छ्वासास त्रास होतो. आजाराच्या शेवटच्या टप्प्यात पोटफुगी, हगवण ही लक्षणे प्रामुख्याने आढळून येतात.

आजाराचे निदान - लक्षणावरून निदान करता येते. मृत्यूनंतर जर त्वरित शवविच्छेदन करण्यात आले, तर प्रामुख्याने हृदयाच्या थैलीमध्ये (पेरीकार्डियल सॅक) द्रव पदार्थांत वाढ झालेली असते. तसेच फायब्रिनच्या गुठळ्या दिसून येतात. फुफ्फुसातील रक्तसंचय आणि द्रवपदार्थात वाढ झालेली दिसते. फुफ्फुसांमध्ये फेस दिसतो. मूत्रपिंडाच्या उती द्रवाने भरतात. मूत्रपिंड मऊ होऊन वेगाने सडण्याची प्रक्रिया चालू होते. उपचार : आजार अल्पमुदत आणि अतितीव्र स्वरूपाचा असल्यामुळे प्रभावी उपचार पद्धतीचा अवलंब करणे शक्य होत नाही. आजाराची लक्षणे दिसल्यास त्वरित पशुवैद्यकांच्या सल्ल्याने औषधोपचार करावे.प्रतिबंधात्मक उपाय : ईटीव्ही लस मॉन्सूनपूर्व म्हणजे १५ जूनपर्यंत आणि मॉन्सूननंतर ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांत दरवर्षी घ्यावी. तीन महिन्यांवरील कोकरे आणि करडांना आंत्रविषाराची लस द्यावी. पशुवैद्यकाकडून गाभण शेळ्या, मेंढ्यांना आंत्रविषार लसीकरण करून घ्यावे. जनावरांना कोवळे, लुसलुशीत हिरवे गवत जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. लहान करडांना, कोकरांना गरजेपेक्षा जास्त दूध पाजू नये. शेळ्या मेंढयांना अति कर्बोदके व पिष्टमय पदार्थ युक्त खाद्य (ज्वारी, मका, इ.) जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. मेलेल्या शेळया, मेंढ्यांचे पशुवैद्यकाकडून त्वरित शवविच्छेदन करून घ्यावे. आंत्रविषार या आजाराने मरण पावल्या असल्यास उर्वरित शेळ्या, मेंढ्यांना आंत्रविषार प्रतिबंधात्मक लसीकरण करावे, प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७९१ : फ्रेन्च संसदेचे पहिले अधिवेशन सुरू
१८३७ : भारतातील पहिले टपाल कार्यालय सुरू झाले.
१८६९ : साली ऑस्ट्रिया देशांत जगात पहिल्यांदा पोस्टकार्ड चा वापर करण्यात आला.
१८८० : थॉमस एडिसनने विद्युत दिव्यांचा कारखाना सुरू केला.
१८९१ : स्टॅनफोर्ड विद्यापीठाची स्थापना
१९४३ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी नेपल्स शहरावर ताबा मिळवला.
१९४६ : युनायटेड किंग्डममधे 'मेन्सा इंटरनॅशनल' या संस्थेची ची स्थापना झाली.
१९४९ : साली जनरल माओ त्से तुंग यांनी चीन लोकशाही वादी गणराज्य(पीपुल्स रिपब्लिक आफ़ चाइना)ची घोषणा केली.
१९५३ : साली भाषांवर आधारित भारतातील पहिले तेलगु भाषिक राज्य आंध्रप्रदेश राज्याची स्थापना करण्यात आली.
१९५८ : भारतात दशमान (मेट्रिक) पद्धत वापरण्यास सुरूवात झाली.
१९५९ : भुवनेशप्रसाद सिन्हा यांनी भारताचे ६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९६० : नायजेरियाला (युनायटेड किंगडमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६९ : कॉनकॉर्ड विमान प्रथमच ध्वनीगती पेक्षा जोरात उडण्यात यशस्वी झाले.
१९७१ : अमेरिकेतील वॉल्ट डिस्ने वर्ल्ड सुरु झाले.
१९८२ : सोनी कंपनीने पहिले कॉम्पॅक्ट डिस्क प्लेयरप्रकाशित केले.
१९९२ : कार्टून नेटवर्क सुरु झाले.
२००२ : भारतीय दंड संहिता, मोटार वाहन कायदा, १९८८ आणि मुंबई प्रतिबंधक कायदा १९४९ अंतर्गत सलमान खान वर गुन्हा दाखल. तसेच मुंबई पोलिसांनी सलमान विरुद्ध भारतीय दंड संहिता कला ३०४(भाग-२) अंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला.
२००५ : इंडोनेशियातील बाली बेटांवर बॉम्बस्फोटांत १९ जण ठार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४७ : ॲनी बेझंट थिऑसॉफिस्ट, सामाजिक कार्यकर्त्या व भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्यांनी हिंदू धर्म व संस्कृतीचे सखोल अध्ययन केले होते. त्यांनी भगवद्गीतेचे इंग्रजीत भाषांतर केले होते. त्यांची ग्रंथसंख्या सुमारे ४५० इतकी आहे. १९१६ मध्ये त्यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली. (मृत्यू: २० सप्टेंबर १९३३)
१८८१ : विल्यम बोईंग बोईंग विमान कंपनीचे संस्थापक (मृत्यू: २८ सप्टेंबर १९५६)
१८९५ : लियाकत अली खान पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान (मृत्यू: १६ आक्टोबर १९५१)
१९०६ : सचिन देव बर्मन संगीतकार व गायक (मृत्यू: ३१ आक्टोबर १९७५)
१९१९ : गजानन दिगंबर तथा ग. दि. माडगूळकर गीतकार, कवी, लेखक, पटकथाकार, अभिनेते. गीतरामायणामुळे त्यांना 'महाराष्ट्राचे वाल्मिकी' म्हणून ओळखले जाते. (मृत्यू: १४ डिसेंबर १९७७)
१९१९ : मजरुह सुलतानपुरी दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९९३) शायर, गीतकार आणि कवी (मृत्यू: २४ मे २०००)
१९२४ : जिमी कार्टर अमेरिकेचे ३९ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते
१९२८ : विझुपुरम चिन्नया तथा शिवाजी गणेशन दाक्षिणात्य अभिनेते (मृत्यू: २१ जुलै २००१)
१९३० : जयदेवप्पा हलप्पा तथा जे. एच. पटेल कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री (३१ मे १९९६ ७ आक्टोबर १९९९) (मृत्यू: १२ डिसेंबर २०००)
१९४५ : साली भारतीय राजनीतिज्ञ व भारताचे विद्यमान १४ वे राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६८ : मोंगकुट ऊर्फ राम (चौथा) थायलंडचा राजा (जन्म: १८ आक्टोबर १८०४)
१९३१ : शंकर काशिनाथ गर्गे तथा 'दिवाकर' नाट्यछटाकार (जन्म: १८ जानेवारी १८८९)
१९५९ : इटलीचे पहिले अध्यक्ष इरिको डी निकोला यांचे निधन. (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)
१९९७ : गुल मोहम्मद जगातील सर्वात बुटकी व्यक्ती (२२.१'')

# मुंबई बाजार समितीची निवडणूक घेण्याचे आदेश



मुंबई : मुंबई (वाशी) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले. संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर प्रशासकाची निवड करण्यात आली होती, ती रद्द करण्यात आली आहे. यामुळे आता निवडणूक होणार की, राष्ट्रीय बाजाराची अधिसूचना निघणार याकडे बाजार घटकांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रीय बाजाराची अधिसूचना १५ दिवसांच्या आत निघणार असल्याचे सूतोवाच पणनमंत्री जयकुमार रावल यांनी नुकतेच पुण्यात केले होते. बाजार समितीचे उपसभापती हुकूमचंद आमधारे, संचालक धनंजय वाडकर, अशोक वाळुंज यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हा आदेश दिला. सुनावणीदरम्यान बाजार समितीचा कोणताही प्रतिनिधी हजर नव्हता. त्यामुळे हा निकाल विरोधात गेल्याचे बोलले जात आहे. न्यायालयाच्या या आदेशानुसार जोपर्यंत निवडणुका होत नाहीत तोपर्यंत बाजार समिती कोणतेही धोरणात्मक निर्णय घेऊ शकणार नाही. ३१ ऑगस्ट रोजी संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर पणन संचालक विकास रसाळ यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती; मात्र ती रद्द केली आहे.



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.१ ऑक्टोबर २०२५ ५



# जामखेड शहरातील अनाधिकृत डीजीटल बॅनरवर कारवाई

## मुख्याधिकारी व पोलीस निरीक्षक उतरले रस्त्यावर

जामखेड प्रतिनिधी

जामखेड शहरातील लावण्यात आलेल्या अनाधिकृत डीजीटल बॅनर व फलकांमुळे शहरातील विद्रूपीकरण वाढत चालले आहे. या लावण्यात आलेल्या अनाधिकृत डीजीटल बॅनरवर जामखेड नगरपरिषद व पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कारवाई करण्यास सुरवात केली आहे. यावेळी मुख्याधिकारी अजय साळवे व पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी स्वतः रस्त्यावर उतरून ही कारवाई केली आहे. या कारवाईचे नागरीकांनी स्वागत केले आहे.

जामखेड शहरातील रस्त्यांच्या कडेला विविध ठिकाणी राजकीय, कमर्शियल पोस्टर, व्यावसायिक बॅनर, शुभेच्छा बॅनर, सह इतर अनाधिकृत बॅनर लावण्याचे प्रमाण वाढले होते. यामुळे शहराचे विद्रूपीकरण वाढले होते. त्यामुळे जामखेड नगरपरिषद व पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या अनाधिकृत डीजीटल बॅनरवर कारवाई करण्यात आली



आहे. यावेळी मुख्याधिकारी अजय साळवे म्हणाले की जामखेड शहरात मोठ्या प्रमाणावर विनापरवाना अनाधिकृत बॅनर लागले होते. याबाबत व्यापारी व बॅनर लावणार्या संबधित नागरीकांना बॅनर लावण्यासाठी परवानगी घ्यावी अशा सुचना दिल्या होत्या मात्र ते परवानगी घेत नव्हते. तसेच सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचे अनाधिकृत बॅनर काढण्याचे आदेश आहेत. तसेच सार्वजनिक ठिकाणी विद्रूपीकरण वाढत चालले आहे. तसेच येथुन पुढे विनापरवानगी बॅनर लावले तर कारवाई करण्यात येईल असे सांगितले. पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी बोलताना सांगितले की जामखेड शहरात कालपासून ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. शहराचे विद्रूपीकरण करण वाढत चालले आहेत. बॅनरवरुन आनेक ठिकाणी वाद होतात. अहिल्यानगर या ठिकाणी देखील बॅनरवरुन एक घटना घडली आहे. त्यामुळे नागरीकांनी परवानगी घेऊन बॅनर लावावेत तसेच ही मोहीम येथुन पुढे सारखी चालुच रहाणार आहे. रस्त्यावर व्यापार्यांनी लावलेल्या आडव्या पाट्या देखील काढुन घ्याव्यात तसेच विनापरवाना डीजीटल बॅनर लावले तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील असे देखील पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी सांगितले. कारवाई दरम्यान जामखेड नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस निरीक्षक वर्षा जाधव, नगरपरिषदचे कार्यालय अधीक्षक संभाजी कोकाटे, पाणी पुरवठा व आरोग्य विभाग ज्ञानेश्वर मिसाळ, कवादे साहेब, निरीक्षक घोडेकर, अभियंता इंजिनिअर अमिर शेख, ढवळे साहेब, सुरज मोहिते, संतोष पवार, प्रमोद टेकाळे, विजय पवार, हितेश वीर, प्रणित सदाफुले, अतुल कोकाटे, राजेंद्र गायकवाड, किरण भोगे, तुषार केवडे, लक्ष्मण माने आदी कर्मचारी स्टाप उपस्थित होते.

## पाटेगाव येथे गोदावरीच्या पुरात शेतकरी वाहून गेला

पैठण । प्रतिनिधी



नाथसागर धरणातून सोडण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणातील विसर्गामुळे गोदावरी नदीला आलेल्या पुराच्या पाण्यात पाटेगाव येथील एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी (दि.३०) उघडकीस आली.

मृत शेतकऱ्याचे नाव ज्ञानेश्वर एकनाथ करपे (वय ४८, रा. पाटेगाव, ता. पैठण) असे आहे. ते जनावरांसाठी नदीकाठावर चारा आणण्यासाठी गेले असता, अचानक आलेल्या पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. काही अंतरावर नदीकाठच्या झुडपांत त्यांचा मृतदेह सापडला. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाने पंचनामा केला. तलाठी दिलीप बाविस्कर आणि योगेश रावस यांच्या उपस्थितीत तपासाची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार रावसाहेब आव्हाड करीत आहेत.

## विद्यापिठातील विजतारा व शेतातील मोटर चोरीप्रकरणी चौघे जेरबंद

परभणी । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परिसरातील वीज पोलवरील २.५ किमी लांबीच्या ॲल्युमिनियम तारा तसेच शेतातील पाण्याच्या मोटारी चोरीप्रकरणी गुन्हे शाखेच्या पथकाने स्थलांतरित चौघांना अटक केली असून, एकूण ६ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि.११ फेब्रुवारी रोजी महावितरणचे सहाय्यक अभियंता लुटे यांनी नवा मोंढा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. विद्यापीठ परिसरातील सुमारे १० खांबांवरील ॲल्युमिनियम तारा अज्ञात व्यक्तींनी चोरल्याचे त्यांनी नमूद केले होते. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासासाठी स्थागुशाच्या पथकाने गोपनीय माहिती आधारे २८ सप्टेंबर रोजी आरोपी प्रद्युम्न ऊर्फ हरभजनसिंग टाक (रा.अण्णाभाऊ साठे नगर, परभणी) याला अटक केली. त्याच्या चौकशीतून त्याने इतर तिघांसोबत मिळून वीजतारा चोरी केली होती. शिवाय त्यांनी पाथरी शिवारातील एका शेतातून मोटार, कापूस व इतर साहित्य देखील चोरी केल्याची कबुली दिली. तपासा दरम्यान नवा मोंढा पोलीस स्टेशन, पो.स्टे.पाथरी, पो.स्टे. पाथरी अंतर्गत चोरी केल्याचे समजले. चोरीतील मुद्देमाल शेख शाकेर शेख हुसेन (रा.सिद्धार्थ नगर, परभणी) यास विकल्याचे आरोपींनी सांगितले. त्यालाही ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून वीजतारा, मोटार व विक्रीतून मिळालेले रोख रक्कम असा एकूण ६ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली व अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, राजू मुत्येपोड, मधुकर चट्टे, अंमलदार निलेश भुजबळ, लक्ष्मण कांगणे, सूर्यकांत फड, रणजीत आगळे, केशव लटपटे, परसराम गायकवाड, उत्तम हनवते, सायबर सेलचे गणेश कौटकर यांनी संयुक्त केली.

## बळीराजाला आधार देण्याकरिता आ. कराड बांधावर

लातूर । प्रतिनिधी

लातूर ग्रामीण मतदार संघांतर्गत असलेल्या लातूर तालुक्यातील गावांत सततचा मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसाणीची पाहणी भाजप-आमदार रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी (दि.२९) थेट बांधावर जाऊन केली. यावेळी त्यांनी शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि शासनाच्या मदतीची खात्री दिली..

आ. कराड यांनी नागझरी, जेवळी, टाकळी, काडगाव, गाधवड, तांदूळजा, कानडी बोरगाव, भिसे वाघोली, माटेफळ, करकट्टा, भोसा, मसला, माटेफळ, करकट्टा यासह अनेक नुकसानग्रस्त गावांची पाहणी केली. शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा स्वीकार केला. कानडी बोरगाव बॅरेजचे दरवाजे दुरुस्त करावेत. भिसेवाघोली येथे रस्त्यालगत खचलेल्या विहिरमुळे बस सेवा बंद झाली असून त्या ठिकाणी तात्काळ संरक्षण भिंत बांधावी निळकंठ गावालगतच्या ओढ्यावरील पुलाची तात्पुरती दुरुस्ती करावी, कळंब-लातूर मेन रोडवरील काडगाव येथील चौकात सातत्याने पाणी साचत असल्याने रस्त्याची उंची वाढवण्याची सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी संबधीत यंत्रनेला केली. यावेळी त्यांच्या समवतेत भाजपा किसान मोर्चाचे विक्रम शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सुरज शिंदे, प्रताप पाटील, सतीश आंबेकर, हनुमंतबापू नागटिळक, बन्सी भिसे, वैभव सापसोड आदींसह अनेकांची तसेच संबधीत मविभागांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६३५**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रहेमानखॉ तबीबखॉ पठाण रा. ढालसखेडा तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अयासखॉ रहेमानखॉ पठाण | मुलगा | १०/०७/१९९३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६३६**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रहेमानखॉ तबीबखॉ पठाण रा. ढालसखेडा तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सलमानखॉ रहेमानखॉ पठाण | मुलगा | २७/११/२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## जालना जिल्ह्यात रेड अलर्ट; सात हजाराहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले

### बाधित लोकांना अन्न धान्यासह जेवणाचीही सोय

जालना । प्रतिनिधी

जोरदार अतिवृष्टीनंतर जिल्ह्यात सर्वत्र रेड अलर्ट जाहीर झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने हालचाली करत सात हजारांहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले. पुरात सापडलेल्या लोकांना अन्न धान्यासह त्यांच्या जेवणाची देखील सोय केली. केवळ माणसानांच नाही तर शेतकऱ्यांच्या पशूधनाला देखील प्रशासनानेच वाचवले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी याबद्दल कलेक्टर व प्रशासनाचे अभिनंदन केले आहे. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीची माहिती पालकमंत्री मुंडे यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडून घेतली. अतिवृष्टीमुळे झालेल्या आपत्तीत नागरिकांना त्रास होवू नये, यासाठी काळजी घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच ज्या भागात पाण्यामुळे धोका निर्माण झाला, त्या भागातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करुन त्यांच्या निवास, जेवणा व वैद्यकीय सोय करण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.



गोदावरी नदीतून सुमारे ३ लाख क्सुसेक इतका विसर्ग करण्यात आल्याने. जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी आणि परतुर तालुक्यांतील गोदावरी नदीच्या काठावरील सुमारे ३८ गावे बाधीत झाली आहेत. यामुळे बऱ्याचशा गावांना स्थलांतरीत करण्यात आले आहे. परतूर, अंबड, घनसावंगी या तालूक्यातील सुमारे ७ हजाराहून अधिक नागरिकांना विविध गावांतून सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्यात आले आले असून, यातील ७ हजार ५९९ नागरिकांना जिल्हा परिषद शाळा आणि विविध समाजमंदिरात केलेल्या निवास व्यवस्थेत ठेवण्यात आले आहे. २३ ठिकाणी अशा निवासव्यवस्था करण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना भोजन आणि सर्व सुविधा पुरविण्यात येत आहेत. अनेक शेतकर्यांच्या पशुधनालाही सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करुन त्यांना चारा देण्यात येत आहे. कोणालाही इजा पोहोचू न देता नागरिकांची काळजी घेतल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व त्यांच्या टीमचे अभिनंदन केले आहे.मागील काही दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे २६ महसूल मंडळातील गावे बाधीत झाली असून, येथील नागरिकांना संकटाला सामोरे जावे लागत आहे. काही भागात घरांची पडझड झाली असून शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. मात्र पूरस्थिती ओसरल्यानंतर नुकसानीची अंतिम आकडेवारी समोर येईल. सध्या नागरिकांना शासनस्तरावरून तातडीची मदत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याचेही मंत्री पंकजाताईंनी सांगितले.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६३४**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रहेमानखॉ तबीबखॉ पठाण रा. ढालसखेडा तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रहेमानखॉ तबीबखॉ पठाण | स्वतः | १३/०६/१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६३७**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रहेमानखॉ तबीबखॉ पठाण रा. ढालसखेडा तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | परवीन रहेमानखॉ पठाण | मुलगी | १६/०२/२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६३८**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रहेमानखॉ तबीबखॉ पठाण रा. ढालसखेडा तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुरया रहेमानखॉ पठाण | मुलगी | १०/०७/१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## सावरगाव गावात पाणी शिरलं; बचाव कार्य सुरू



जालना । प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील सावरगाव बु. येथे अतिवृष्टी व गोदावरी नदीचे बॅक वॉटर पाणी गावात शिरले असल्याने माजी मंत्री तथा आमदार श्री.बबनराव लोणीकर आले असता गावात येऊन सर्व लोकांना स्थलांतर करण्याबाबत तसेच आष्टी व लोणी येथे राहण्याची व जेवण्याची व्यवस्था असल्याने गावकऱ्यांना विनंती केली. तसेच सर्व गावकऱ्यांनी काळजी घ्यावी मी सुखदुःखात गावकऱ्यांसोबत आहे असे आ. लोणीकर यांनी गावात येऊन सर्व लोकांना संबोधित करून धीर देण्याचे काम केले.

तसेच काही परिस्थिती उद्भवल्यास सर्व लोणीकर टीम सोबत असल्याचे लोणीकर साहेबांनी सांगितले. यावेळी सोबत उपविभागीय अधिकारी परतुर, कृषी अधीक्षक जालना, गटविकास अधिकारी परतुर, आरोग्य अधिकारी,तुकाराम सोळंके, गजानन लोणीकर, रमेश थोरात,विठ्ठल तौर, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक व गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.

# आपला दसरा, आपली परंपरा.. भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण



पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव घाट येथील भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्याची तयारीने पूर्ण झाली आहे. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दरवर्षी हा परंपरागत दसरा मेळावा अलोट जनसागराच्या साक्षीने मोठया उत्साहात पार पडत असतो. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा आदर्श ठेवून राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे दर्शन घेण्यासाठी व ना. पंकजाताईंचे मार्गदर्शन पान २ वर

### ना.पंकजाताईंचे होणार जोरदार स्वागत

भगवान भक्तीगडावरील १८ एकर परिसरात हा मेळावा होणार असून डागडूजी, परिसराची स्वच्छता, हेलपॅड, वाहनतळ, स्टेज, बॅरेकेटिंग आणि इतर कामांनी वेग घेतला आहे. पंकजाताई मुंडे यांच्या स्वागताची देखील ग्रामस्थांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मेळाव्यास राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच बाहेरूनही लाखोंच्या संख्येने भाविक येतात, त्यांची गैरसोय होऊ नये याची खबरदारी घेण्यात येत आहे.

### पंकजाताईंचे मार्गदर्शन

हा मेळावा म्हणजे भक्ती आणि शक्तीचा संगम मानला जातो. मेळाव्याच्या व्यासपीठावर अध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहतात. संत भगवान बाबा आणि लोकनेते मुंडे साहेबांना मानणारा मोठा वर्ग दरवर्षी पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी येत असतो. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील पंकजाताई मुंडे यांचे २ तारखेला हेलिकॉप्टरने सावरगांवला आगमन होणार आहे. संत भगवान बाबांचे दर्शन घेऊन सकाळी ११ वा. त्या मेळाव्यास संबोधित करतील. दरम्यान मेळाव्यात येणाऱ्या भक्तांसाठी सावरगांव ट्रस्टच्या वतीने नव्यानेच बांधण्यात आलेल्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब सभागृहात नाश्ता, जेवण व पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

# नारायणगडच्या विजयी दसरा मेळाव्याची जोरदार तयारी

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व जनतेचे श्रध्दास्थान अन महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायणगडावर यंदाच्या वर्षीचा दि.०२ ऑक्टोबर रोजी विजयी दसरा मेळाव्याचे आयोजन संदर्भात मागील पंधरा दिवसापासून तयारी जोरदार सुरू असून मैदान साफ सफाई करून स्टेज साऊंड सिस्टीम, रस्ते पार्किंग व्यवस्था नियोजनबध्द करण्यात येत आहे. यामुळे या ऐतिहासिक होणार्या दसरा मेळाव्याकडे बीड जिल्ह्याचे लक्ष केंद्रित होणार आहे.

श्री क्षेत्र नारायणगड संस्थान येथे २०२४ मध्ये ऐतिहासिक दसरा मेळावा मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील, मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या उपस्थितीत लाखो समाज बांधवांच्या साक्षीने पान २ वर



### दसरा मेळाव्याची तयारी पुर्ण– गुळवे, घाडगे

महाराष्ट्र ची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगड दसरा मेळावा दोन दिवसांवर आलेल्या असून हैदराबाद गॅझेट सातारा गॅझेट अंमलबजावणी नंतर या विजयी दसरा मेळाव्यासाठी मनोज जरांगे पाटील, मठाधिपती महंत शिवाजी महाराज या ऐतिहासिक दसरा मेळावा माध्यमातून समाजाची संवाद साधणार आहे. यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून समाज बांधवांनी सहभागी व्हावे तसेच मेळाव्यासाठी गडाच्या पंचक्रोशीतील स्वयंसेवक भाविक भक्त, दानशूर व्यक्तींनी शक्य होईल तसे दसरा मेळाव्याला येणाऱ्या भाविकांसाठी पाण्याची बॉटल, चहा पाणी, बिस्किटे नाष्टा ची व्यवस्था करावी. याचबरोबर दसरा मेळाव्याची परवानगी आणि तयारी प्रशासकीय स्तरावर आणि स्थानिक स्तरावर पुर्ण केली आहे असे समाजसेवक दिनेश गुळवे, बाळासाहेब घाडगे यांनी सांगितले सांगितले.

# पाटोदा तालुक्यातील जवळपास सर्वच बंधाऱ्यांची दयणीय अवस्था,प्रशासन ढीम्म

पाटोदा । पतिनिधी

पाटोदा शहरात मागील तीन ते चार दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे मांजरा नदीला महापूर आला आहे. या महापुरामुळे रेणुका माता मंदिर परिसरातील माळावरची देवीजवळ असलेल्या तिरुका शिवार येथील जुन्या बंधाऱ्याला मोठा धोका निर्माण झाला आहे

महापुरात वाहून आलेली मोठमोठी झाडे या बंधाऱ्याच्या होलमध्ये अडकली असून त्यामुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह अडथळा निर्माण होतो आहे. यामुळे पाण्याचा जोरदार दाब वाढून नदीचे पाणी आजूबाजूच्या शेतात घुसले आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, मागील दोन दिवसांत अनेक झाडे या ठिकाणी अडकली असून त्यामुळे सुमारे २० ते २५ शेतकऱ्यांच्या एक हजार फुटांपर्यंतच्या शेतजमिनी जलमय झाल्या आहेत त्याचप्रमाणे बिनवडे वस्ती येथील बंधारा देखील तुंबल्यामुळे राहुल बिनवडे तसेच अनेक जणांच्या शेतीमध्ये पाणी शिरले आहे त्यामुळे मोठा धोका निर्माण झाला आहे .या भागातील शेतकऱ्यांच्या दाव्यानुसार हा बंधारा जवळपास ३२ वर्षे जुना असून, यातील एक लेन दोन वर्षांपूर्वीच वाहून गेली होती. आता उरलेल्या लेनवरही महापुरात वाहून आलेली झाडे अडकली असल्याने या बंधाऱ्याचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. यापूर्वीच ढगफुटी आणि पावसामुळे शेतकऱ्यांचे शंभर टक्के पीक नुकसान झाले होते. मात्र आता नदीचे पाणी शेतात घुसल्यामुळे जमीनच खरडून निघत आहे, त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. या संदर्भात पाटोद्याचे तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांनी माहिती घेतल्यानंतर बंधारा कोणत्या विभागाकडे आहे, हे तपासून पुढील कार्यवाही केली जाईल, असे पान २ वर

# यावर्षीचा श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड दसरा मेळावा स्थगित –आ.सुरेश धस

आष्टी । पतिनिधी



गेल्या काही दिवसांपासून राज्यातील पूरपरिस्थिती आणि शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान पाहता यंदाचा श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील दसरा मेळावा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून केवळ पारंपरिक पूजन आणि गडावर समाधी बांधकामाच्या शिलारोहन कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष आ.सुरेश धस यांनी दिली आहे.

मराठवाड्यात अतिवृष्टीने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. यामध्ये आष्टी विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.पुरात अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टर व बोटींच्या साह्याने स्थलांतरित करण्याची वेळ यावेळी ओढवली आहे.ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या तुलनेत दीडपट जास्तीचा पाऊस झाल्यामुळे जोमात आलेले खरीप हंगामातील पीक आडवे झाले. अनेक शेतकऱ्यांच्या पान २ वर

# सरपंच परिवंत गायकवाड यांनी स्वखर्चातुन केला रस्ता दुरुस्त

आष्टी । पतिनिधी

आष्टी तालुक्यातील क-हेवडगाव गावाच्या शिवारात असलेल्या मोठ्या तलावाच्याखाली असलेल्या नागरगोजेवस्ती ते अ.नगर ते बीड राज्य महामार्गापर्यंत सरपंच परिवंत गायकवाड यांनी ग्रामस्थांच्या सोयीसाठी स्वखर्चाने आडीच कि.मि.रस्ता दुरूस्ती केली आहे.हा रस्ता नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीने पूर्णपणे खराब व खड्डेमय झाला होता. शासकीय निधी उपलब्ध होण्याची वाट न पाहता आ.सुरेश धस यांच्या आदेशाने हा आडीच कि.मि.चा रस्ता खडी व मुरुम टाकुन दुरुत केला आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी,दुध उत्पादक शेतकरी, ग्रामस्थ यांची वाहतुकीची सोय झाली आहे.सरपंच परिवंत गायकवाड यांच्या या तात्काळ केलेल्या रस्ता दुरुस्ती कामाचे कौतुक होत आहे.

यापुर्वी नेत्रतपासणी व मोफत चष्मे वाटप,रक्तदान शिबीरे,शालेय विद्यार्थीना गणवेश व शालेय साहित्य वाटप व नवरात्र उत्सवानिमित्त तुळजापूर येथुन आणण्यात येणाऱ्या ज्योतसाठी क–हेवडगाव येथील युवकांना आर्थिक मदत केली आहे. सामाजिक व धार्मिक कार्यात सरपंच गायकवाड यांचा मोठा पुढाकार व अर्थसहाय्य असते.ग्रामविकास करीत ते घरकुल योजना,शेततळे,जलसिंचन विहीरी, पांदण रस्ते,वस्ती रस्ते आदि वैयक्तिक लाभाच्या जास्तीजास्त योजना ते वैयक्तिक लक्ष देऊन राबवितात. याशिवाय क–हेवडगाव येथील जि.प.प्रा.शाळेला २५ लाख रु.सरंक्षण भिंत बांधकाम, नागरगोजेवस्ती येथील जि.प.प्रा. वस्ती शाळेसही २५ लाख रु.चे सरंक्षण भिंत बांधकाम पान २ वर

# मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस वीस वर्षाची शिक्षा

बीड । प्रतिनिधी

**अल्पवयीन मुलीवर बळजबरी लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीला न्यायमूर्ती एस.एस. घोरपडे यांनी दोषी ठरवून वीस वर्ष करावास व दहा हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास सहा महिन्याचा सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली.**

याप्रकरणी अधिक माहिती अशी की, दिनांक १६ मार्च २०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता अल्पवयीन मुलगी दुकानात चॉकलेट आणण्यासाठी गेली असता तिला पेप्सी अआण असे सांगून घरी बोलावले व घरामध्ये चाकूचा धाक दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर पिडीतेच्या आईच्या फिर्यादीवरून पेठ बीड पोलीस ठाण्यात कलम ३७६ (अ)( ब )भादवी आणि कलम ४, ६, १२ बाललैगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षकांनी केला व जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष न्यायालयात आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती एस.एस. घोरपडे यांच्यासमोर झाली. सरकारी पक्षाच्या वतीने एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले.सदर प्रकरणात पिडीत, फिर्यादी, प्रत्यक्ष दर्शी साक्षीदार ,पंच पान २ वर

# फुलसांगवी साठवण तलाव ओव्हर फ्लो..



शिरूर । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा कहर चालू असतानाही फुलसांगवी साठवण तलाव रिकामाच राहिला होता. याही वर्षी भरेल की नाही अशी शंका असताना सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस म्हणजे मंगळवार दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी या तलावाच्या सांडव्यावरून पाणी ओसंडून वाहू लागले. याचा आनंद जरी असला तरी सिंदफणा व गोदावरी पट्ट्यातील शेतकरी बांधवांचे झालेले प्रचंड नुकसान पाहून अतिवृष्टीचा कहर शेतकऱ्याच्या मनाला वेदना देणारा ठरत आहे.

गेल्या आठ दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यामध्ये नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र मध्ये वरून राजाने अतिवृष्टीचे थैमान मांडले होते. यामुळे शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला घास वरूण राजाने हिसकावून तर घेतलाच आहे परंतु गोदावरी सिंदफणाकाठीच्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्यामुळे पान २ वर

### १९ वर्षात दुसऱ्यांदा तलाव ओव्हर फ्लो..

फुलसांगवी साठवण तलावाला प्रत्यक्ष सन १९९९ मध्ये मंजुरी मिळाली होती. या तलावाचे सुमारे चार–पाच वर्षे काम चालू होते. सप्टेंबर २००६ मध्ये या तलावाचे काम पूर्णत्वास गेले होते. त्यानंतर गेल्या १९ वर्षात हा तलाव २०२१ मध्ये पूर्ण क्षमतेने भरला होता व त्यानंतर या वर्षी पुन्हा एकदा तलाव पूर्ण क्षमतेने भरलेला पाहायला मिळत आहे.

# सरकारी कामात अडथाळा तीन आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड । प्रतिनिधी



दि २२/०९/२०२५ रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयाने तीघांना वाहतुक नियमांचे उल्लंघन व पोलीस कर्मचाऱ्यास गंभीर दुखापत आणि सरकारी कामात अडथळा निर्माण करणे च्या आरोपातून निर्दोष मुक्त केले. आरोपी मार्फत ॲड.प्रवीण भ. राख यांनी काम पाहिले.

यातील फिर्यादी पोलीस हेड कॉन्स्टेबल झुंबर जायभाये यांच्या फिर्यादी प्रमाणे ते घटनेच्या दिवशी त्यांच्या वरिष्ठ अधिकारी एपीआय सय्यद व इतर कर्मचाऱ्यांसोबत मोटर वाहन कायद्याच्या उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करत असताना नगर नाका बीड येथे मोटर सायकल स्वार यांना त्यांनी अडवले व कागदपत्राची मागणी केली असता त्यांना तिन्ही आरोपींनी धक्काबुक्की व मारहाण करून दुखापत केली व सरकारी कामात अडथळा आणला. तसेच त्यातील मोटर सायकल स्वार हा अल्कोहोल प्राशन केल्याचे आढळल्यामुळे त्याच्यावर ब्रीथ अनालायझर मशीन द्वारे तपासणी करण्यात आली ज्यात पान २ वर

# डॉ.योगेश क्षीरसागर यांची अधिकाऱ्यांसोबत बैठक

## पुरामुळे नुकसान झालेल्या रस्ते, पुलांच्या दुरुस्तीला गती; काही कामे प्रगतीपथावर

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक भागात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे रस्त्यांसह पूल वाहून गेले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन काही गावांचा दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.३०) जिल्हा परिषदेच्या बांधकाम पान २ वर



# कर्मचाऱ्यास मारहाण करणाऱ्या तिघांना चार वर्षाची शिक्षा

बीड । प्रतिनिधी



बीड येथील सरकारी दवाखान्यांमध्ये ब्रदर असलेले प्रशांत प्रभाकर सुकाळे यांना २५ डिसेंबर २०२१ रोजी रात्री एक ते दोन च्या सुमारास वार्ड क्रमांक पाच मध्ये काम करत असताना आरोपी ईसराइल शेख हा शरीक होण्यासाठी आला होता. त्याच्यासोबत आलेला ज्ञानेश्वर शिंदे हा ईसराईलला ऍडमिट करायचे नाही. त्याला घरी घेऊन जायचं आहे असे म्हणाला त्यानंतर प्रशांत सुकाळे हा पेशन्ट जवळ गेला व त्याला सांगितले. तुमच्यासोबत आलेले शिंदे पेपर देत नाहीत ते ऍडमिट करायचे नाही असे सांगतात. त्यानंतर ईसराईल याने संतोष थोरात याला फोन लावून बोलण्यास दिला.यावेळी फोनवर संतोष थोरात पान २ वर

# श्रीकांत सानप यांनी घेतल्या पुरग्रस्तांच्या भेटी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीच्या महापुरामुळे गंगाथडी भागात अनेक गावे पूरग्रस्त झालेले आहेत. शेती, घरे, पशुधन याचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. महापुरामुळे बाधित झालेल्या आगरनांदूर, खामगाव, नागझरी, रेवकी देवकी, संगमजळगाव, पांढरी, राहेरी,भोगलगाव, गंगावाडी, बोरगाव थंडी, राजापूर या गावांतील लोकांना जायकवाडी कॅम्प व तलवाडा येथे तात्पुरते स्थलांतरित केलेले आहे. त्यांना प्रशासनाकडून आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविल्या पान २ वर



# आष्टी तालुक्यातील कष्टाळु शिक्षकांमुळे शैक्षणिक गुणवत्ता उत्तम–आ.धस, माजी आ.धोंडे



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शैक्षणिक वातावरण चांगले आहे. येथे दर्जेदार शिक्षण देणारे शिक्षक, शिक्षीका कार्यरत आहेत.कष्ट,सचोटी प्रमाणिकपणे अध्यापनाचे कार्य करत राहणे हे प्रामाणिक शिक्षकांचे लक्षण असते.निष्ठेने व प्रमाणिक,चांगले काम केल्यास कर्तव्यपूर्तीचे समाधान मिळत असते.आदर्श पिढीघडवित असताना गुरुजनांना आत्मिक समाधान लाभत असते.आष्टी तालुक्यातील कष्टाळु शिक्षकांमुळे शैक्षणिक गुणवत्ता उत्तम असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस,माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील कडा येथील स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेच्या ५१ व्या.वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी ते बोलत होते. स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पान २ वर

# डॉ.आरीफ यांच्यासारख्या अभ्यासू डॉक्टरांची भारताला गरज-डॉ.सुरेश खुरसाळे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ.आरीफ अली उस्मानी यांच्यासारख्या अभ्यासू व तज्ज्ञ डॉक्टरांची भारताला गरज आहे, त्यामुळे त्यांनी भारतात राहून सेवा करावी आणि वैद्यकीय सेवेचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करावा अशी अपेक्षा डॉ.सुरेश खुरसाळे यांनी व्यक्त केली. तर जो पर्यंत आपण आपली माती, आपला देश सोडून परदेशात जात नाहीत. तो पर्यंत त्या मातीचं, मातृभुमीचं महत्व आपल्याला कळत नाही असे भावोद्गार डॉ.आरीफ अली उस्मानी यांनी काढले.



नुकतेच लंडन येथील रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियनची फेलोशिप प्राप्त केल्याबद्दल डॉ.आरीफ यांचा हृद्य सत्कार अंबाजोगाईत मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

अंबाजोगाईचे भुमिपुत्र डॉ.आरीफ अली उस्मानी यांनी लंडन येथील रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियनची फेलोशिप मिळवून डब्लिन, पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून २२ अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त

## कामकाजाप्रती सेवावृत्ती व त्यांचा आदरभाव कायम स्मरणात राहील-सह आयुक्त मनोज लोणकर



पिंपरी । प्रतिनिधी

**महानगरपालिका सेवेत वर्षानुवर्षे उत्तमरित्या सेवा करून सेवानिवृत्त होणारे आपल्या सहकारी अधिकारी,कर्मचारी यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवत आपल्या कार्याचा प्रत्यय दिला आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर यांनी केले आणि सेवानिवृत्त होणा-या अधिकारी,कर्मचा-यांना पुढील वाटचालीसाठी आरोग्यदायी शुभेच्छाही दिल्या.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत मधुकर पवळे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात माहे सप्टेंबर २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या १२ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १० अशा एकूण २२ कर्मचाऱ्यांचा सह आयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमास उप आयुक्त संदीप खोत,मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे तसेच महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. माहे सप्टेंबर २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये स्थापत्य उप अभियंता राजेंद्र डुंबरे, असिस्टंट मेट्रन नंदिनी कदम, मध्यवर्ती औषध भांडार विभागाचे व्यवस्थापक मोहम्मद अब्दुल अब्बास, कार्यालय अधिक्षक सुभाष कुंभार, अंबर चिंचवडे, फार्मासिस्ट सुनील नाथे, उप शिक्षक शांता वायाळ, नयना रत्नपारखी, वायरलेस ऑपरेटर उषा कदम, इलेक्ट्रीक मोटार पंप ऑपरेटर लक्ष्मण लोखंडे, मुकादम कविता गोहेर, मजूर चंद्रकांत साठे यांचा समावेश आहे. तर स्वेछानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मुख्य लिपिक दत्तात्रय सातव, सफाई कामगार अलका काळे, चंदा शरद, सफाई सेवक कैलास बाराथे, दांडग्या भोसले, सफाई कामगार सुनिता भोसले, जयसिंग नढे, नंदू घुले, कचरा कुली नवनाथ जाधव, गटर कुली सुनिल जावळे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले तर सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

## डंपरच्या धडकेत पाय गमावलेल्या ज्येष्ठाला एक कोटींची भरपाई

पुणे । प्रतिनिधी

**भरधाव डंपरच्या धडकेत दोन्ही पाय गमावलेल्या ज्येष्ठ नागरिकाला मोठा दिलासा मिळाला आहे. पुणे जिल्हा न्यायालयातील मध्यस्थी प्रक्रियेद्वारे नॅशनल इन्शुरन्स कंपनीने त्यांना एक कोटी रुपयांची नुकसानभरपाई दिली. दीर्घकाळ न्यायालयीन लढाई टाळून अल्पावधीतच मिळालेल्या या भरपाईमुळे अपघातग्रस्त दुचाकीचालकाचा दिलासा झाला आहे.**



सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली देशभरात 'राष्ट्रासाठी मध्यस्थी' ही विशेष मोहीम राबविली जात आहे. याच उपक्रमांतर्गत प्रलंबित असलेला हा दावा पुणे न्यायालयात मध्यस्थीद्वारे निकाली काढण्यात आला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांच्या हस्ते अपघातग्रस्त ज्येष्ठ नागरिकाला भरपाईचा धनादेश प्रदान करण्यात आला. बिबवेवाडी येथे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाचा एप्रिल २०१९ मध्ये कामशेत-जवण मार्गावर अपघात झाला होता. भरधाव डंपरच्या धडकेत त्यांचे दोन्ही पाय कायमचे गमावले. शेतीपूरक उद्योगावर उदरनिर्वाह करणाऱ्या या ज्येष्ठाने डंपरच्या मालकासह विमा कंपनीविरोधात मोटार अपघात न्यायाधिकरणाकडे दावा दाखल केला होता. त्यांची बाजू ॲड. श्रीकांत काळे यांनी मांडली.

न्यायाधिकरणाचे न्यायाधीश जे. जी. डोरले यांनी हे प्रकरण तडजोडीसाठी पाठविले. त्यानंतर न्यायाधीश बी. डी. कुलकर्णी यांच्या आदेशानुसार ॲड. अतुल गुंजाळ यांची तज्ज्ञ मध्यस्थ म्हणून नियुक्ती करण्यात आली. विमा कंपनीतर्फे ॲड. रमेश नेऊरगावकर यांनी काम पाहिले. मध्यस्थीतून कंपनीने भरपाई देण्यास संमती दर्शवली. अखेर सामोपचाराने झालेल्या या तडजोडीमुळे दीर्घकाळ प्रलंबित राहिलेला दावा निकाली निघाला.

## जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन निमित्त १ ऑक्टोबर २०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता होणार आहे.

केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची विशेष उपस्थिती यावेळी असणार आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची देखील प्रमुख उपस्थिती असणार आहे. याशिवाय खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अमित गोरखे, उमा खापरे, महेश लांडगे, शंकर जगताप, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे तसेच माजी खासदार, माजी आमदार, माजी नगरसदस्य, माजी नगरसदस्या तसेच महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर तसेच महानगरपालिकेतील विविध विभागप्रमुख, विविध सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, सदस्य यावेळी उपस्थित राहणार आहेत. तरी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

## शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या आमिषाने ९७ लाखांची फसवणूक

पुणे। प्रतिनिधी

**शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी कर्वेनगर भागातील एका व्यक्तीची ९७ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध शिवाजीनगर येथील सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ४७ वर्षीय व्यक्तीने फिर्याद दिली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व्यक्ती हे कर्वेनगर भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाईलवर मेसेज पाठवला होता. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते. चोरट्यांनी त्यांना टेलीग्राम ॲपमध्ये ॲड करून घेतले. त्यानंतर एक लिंक पाठवून शेअर बाजारातील विविध योजनांविषयी माहिती दिली होती. सुरुवातीला व्यावसायिकाने थोडी रक्कम गुंतविली. गुंतवणुकीवर चोरट्यांनी त्यांना परतावा दिल्याचे भासाविले. प्रत्यक्षात मात्र त्यांना परतावा देण्यात आला नव्हता. परतावा




समाज माध्यमातील समुहात दिसल्याने व्यावसायिकाचा विश्वास बसला. त्यानंतर चोरट्यांनी शेअर बाजारात आणखी रक्कम गुंतविण्यास सांगितले. व्यावसायिकाने शेअर बाजारात गेल्या पाच ते सहा महिन्यात वेळोवेळी ९७ लाख ५० हजार रुपये गुंतविले. रक्कम गुंतविल्यानंतर त्यांना परतावा दिला नाही, त्यानंतर त्यांनी चोरट्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. चोरट्यांनी त्यांना प्रतिसाद दिला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्वप्नाली शिंदे तपास करत आहेत.

## कुदळवाडीत स्वतंत्र औद्योगिक पार्क उभारा-उपमुख्यमंत्री अजित पवार

पिंपरी। पतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली, कुदळवाडी भागात लघुउद्योजकांसाठी औद्योगिक पार्क तयार करा. ज्या भागांत लघुउद्योग होते, त्याच जागी पुन्हा ते वसवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी एमआयडीसीसह संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**



पिंपरी-चिंचवडमधील लघुउद्योजकांच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या प्रतिनिधींसोबत पिंपरी-चिंचवड महापालिकेत सोमवारी (दि. २९) बैठक झाली. त्यात त्यांनी वरील सूचना केल्या. बैठकीत विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आयुक्त शेखर सिंह, पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, पीएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, सहआयुक्त हिंमत खराडे, महावितरण मुख्य अभियंता सुनील काकडे, पुणे महापारेषण परिमंडल मुख्य अभियंता अनिल कोलप, एमआयडीसी उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष भिसे, मुख्य अभियंता कैलास भांडेकर, प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, अर्चना पठारे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे पुणे प्रादेशिक अधिकारी बाबासाहेब कुकडे, उपप्रादेशिक अधिकारी मंचक जाधव, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल व अधिकारी उपस्थित होते. बैठकीत लघुउद्योजकांनी विविध समस्या मांडला. महापालिकेने कारवाई करीत चिखलीत कुदळवाडीतील भंगार दुकाने व गोदामावर सरसकट कारवाई केली. त्यात लघुउद्योगाच्या शेडवर कारवाई केली. पूर्वी ज्या ठिकाणी लघुउद्योग होते, त्याच ठिकाणी औद्योगिक पार्क विकसित करावी, अशी त्रस्त लघुउद्योजकांची आग्रही मागणी आहे. त्यावर बैठकीत चर्चा झाली. त्या मुद्यांवर अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच, उद्योजकांना देण्यात आलेल्या सर्व एलबीटी नोटिसा रद्द करावी, टी २०१ पुनर्वसन प्रकल्प, सीईटी प्लाण्ट व घातक कचरा विल्हेवाट लावणे, औद्योगिक परिसरात रस्ते व भुयारी गटार योजना राबवणे, सहा नवीन वीज उपकेंद्र उभारणीसाठी एमआयडीसीमध्ये महावितरणला भूखंड उपलब्ध करून देणे, वाढत्या अनधिकृत झोपडपट्टी व वाढती अनधिकृत भंगार दुकाने व गोदामे बंद करणे. नाला अतिक्रमण हटवावे. सेवा शुल्कवाढ रद्द करावी, लघुउद्योजकांच्या संघटनेसाठी वृक्षलागवड व संवर्धनासाठी भोसरी, चिंचवड, पिंपरी येथे भूखंड उपलब्ध करून द्यावेत, असे मुद्दे बैठकीत मांडण्यात आले. त्यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. अजित पवारांनी एमआयडीसी, महापालिका, महवितरण व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याचा सूचना केल्या.

## विद्यापीठाच्या क्रमवारीत घसरणीला सतत होणारी आंदोलनं कारणीभूत!-शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील

पुणे । प्रतिनिधी

**राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान घसरण्यामागे प्राध्यापकांची कमतरता हे एक कारण असले, तरी विद्यापीठात सतत होणाऱ्या आंदोलनांमुळे देश- विदेशात निर्माण होणारी नकारात्मक प्रतिमा हेही महत्त्वाचे कारण आहे, असे स्पष्ट मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्या प्रतिमेवर थेट खापर फोडतानाच, प्राध्यापकांच्या भरतीतील आणि राज्याच्या आर्थिक अडचणी महिन्याभरात मार्गी लावण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६ व्या पदवी प्रदान कार्यक्रमात पाटील बोलत होते. नॅकच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे, सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा घेतला. त्यानंतर पाटील



म्हणाले, विद्यापीठातील १११ प्राध्यापकांच्या भरतीला मान्यता होऊन दीड वर्ष झाले; पण काही नियमांच्या अडचणी आल्या आहेत. महाविद्यालयांतील प्राध्यापकांबाबत राज्याच्या आर्थिक अडचणी आहेत. सगळ्या अडचणींवर मात करून महिन्याभरात ते सगळे मार्गी लागेल. मानांकनासाठी तेवढा एकच निकष असतो का? क्रमवारीबाबत मुख्यमंत्रीही चिंतेत पडले. याबाबत बरीच चर्चा केली, तर यात वेगवेगळे २० निकष आहेत. त्यातील एक आहे विद्यापीठाच्या प्रतिमेचा. मीही विद्यार्थी चळवळीतून आलो आहे. विद्यार्थी, प्रश्न, आंदोलन याविरोधात मी नाही. मात्र, आंदोलनांचे स्वरूप कसे असावे, समन्वयाने प्रश्न सोडवता येतील का, याचा विद्यापीठानेही प्रयत्न करावा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कधी आंदोलने झालीच नाहीत. याचे कारण रयतेला काय हवे आहे, हे त्यांना आधीच कळायचे, तसेच समाजमाध्यमातून देशभर, जगभर काय संदेश जातो, याचाही विचार केला पाहिजे. विद्यापीठात सतत आंदोलनेच होत आहेत, तर देशातील विद्यार्थी इथे कशाला येतील. विदेशातील विद्यार्थी आपल्याकडे येण्यासाठी या वर्षी आपण एक संस्था नियुक्त केली. त्याचा उत्तम परिणाम दिसून आला आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढली पाहिजे, तसेच प्राध्यापक भरती, निधी देणे, सीएसआर मिळवणे, यासाठी मदत करण्यात येईल, असेही पाटील म्हणाले.

## तळेगाव परिसरात बिबट्याची दहशत

तळेगाव ढमढेरे

**तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) गणेश मळा येथे मंगळवारी (दि. ३०) दिवसा बिबट्याचे दर्शन झाल्याने परिसरात खळबळ उडाली. येथील श्वेता ढमढेरे व सुनीता ढमढेरे या शेतकरी महिलांना दिवसा बिबट्याचे दर्शन झाले.**



यावेळी त्यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने उसात पळ काढला. महिलांच्या आवाजाने तेथील स्थानिक ॲड. संपत ढमढेरे, दिलीप ढमढेरे, अनिल ढमढेरे, गणेश ढमढेरे, राहुल ढमढेरे,आकाश ढमढेरे, संजय ढमढेरे या वेळी एकत्र येऊन बिबट्यापासून संरक्षण होण्यासाठी वनविभागाकडे पिंजऱ्याची मागणी केली. यावेळी ॲड. संपत ढमढेरे म्हणाले, "तळेगाव ढमढेरे परिसरातील गणेश मळा, केवटेमळा, कोल्हेमळा व ढमढेरे वस्ती या ठिकाणी अनेकवेळा बिबट्याचे दर्शन झाले असून, पाळीव प्राण्यांवर बिबट्याने हल्ला केला आहे. परिसरात बिबट्यांची संख्या वाढली असून, वास्तव्य वाढले आहे. त्यामुळे दररोज नागरिकांना बिबट्याचे दर्शन होत आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, शालेय मुले बिबट्याच्या दहशतीने घाबरत आहेत. वनविभागाने परिसराची पाहणी करून त्वरित पिंजरा लावावा."

## मुंढवा,केशवनगरची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आराखडा तयार करा -खा.डॉ.अमोल कोल्हे

पुणे । प्रतिनिधी

**मुंढवा आणि केशवनगर भागातील नागरिक वाहतूक कोंडीमुळे त्रस्त असून या भागातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सर्वंकष आराखडा तयार करा आणि नागरिकांना दिलासा द्या, अशी सूचना खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सोमवारी महापालिका प्रशासनाला केल्या.शिरूर लोकसभा मतदार संघात हडपसर विधानसभा मतदार संघ येतो. या विधानसभा मतदार संघातील विविध प्रश्नांसाठी डॉ. कोल्हे यांनी महापालिकेच्या घोले रस्ता क्षेत्रीय कार्यालयात सोमवारी अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली.**

या बैठकीस महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, ओमप्रकाश दिवटे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक योगेश ससाणे यांच्यासह महापालिकेचे विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.यावेळी नागरिकांनी वाहतूक कोंडी, कचऱ्याची समस्या, अपुरा पाणीपुरवठा आदींसह विविध प्रश्न मांडले.



कचऱ्यामुळे हडपसर अस्वच्छ होत आहे, पाणी दूषित होत आहे, बोअरवेलमध्येही दूषित पाणी येते या प्रश्नांचा त्यात समावेश होता. शहरातील चारही दिशांना प्रकल्प होणार होते, असे असताना सर्व प्रकल्प केवळ हडपसरलाच का, हडपसरवर महापालिका अन्याय का करत आहे, शहराला नको असलेले प्रकल्प हडपसरला दिले आहेत. येथे नागरीक रहात नाहीत का, असा सवाल या नागरिकांनी विचारला. रामडेकडी येथे ७०० टनाचा कचरा प्रकल्पा आहे. हा प्रकल्प सुरू नाही, तरीही येथे कचरा येतो, तो भरला जातो, अशी तक्रारही यावेळी करण्यात आली. हडपसर परिसरात किती कचरा प्रकल्प आहेत आणि शहराच्या इतर भागात किती प्रकल्प आहे, शहराच्या चारही भागात कचरा प्रकल्प उभारण्याचे काय झाले, असे प्रश्न डॉ. कोल्हे यांनी प्रशासनाला विचारले. त्यावर अधिकारी निरुत्तर झाल्याचे पहायला मिळाले. होर्डींग सुरक्षेसाठी काय व्यवस्था केलेली आहे का, हे विचारल्यावर अधिकाराऱ्यांनी सर्व्हे करून होर्डींग आणि फलक लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यावर केवळ बोर्ड नको तर त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करा आणि त्याचा रिपोर्ट सादर करा, असे आदेश महापालिका आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## नृत्यांगना गौतमी पाटीलच्या कारने रिक्षा चालकाला उडवलं

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील प्रसिद्ध नृत्यांगना व डीजे डान्सर गौतमी पाटील यांच्या नावावर नोंदणीकृत कीया कंपनीच्या कारने मुंबई-बंगळूरू महामार्गावरील वडगाव बुद्रुक येथे रिक्षाला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात रिक्षाचालक गंभीर जखमी झाला असून, रिक्षातील दोन प्रवासीही जखमी झाले आहेत.**



अपघातानंतर कारचालकाने कारसह फरार होण्याचा प्रयत्न केला, मात्र सिंहगड रस्ता पोलिसांनी अवघ्या काही तासांत त्याला ताब्यात घेतले आहे. हा अपघात मंगळवारी (३० सप्टेंबर) पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास हॉटेल विश्वासच्या समोर घडला आहे. मिळालेल्या अधिक माहितीनुसार, गौतमी पाटील यांच्या कीया कारने रिक्षाला मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी प्रचंड होती की रिक्षा रस्त्यावर उडाला आणि त्याचे मोठे नुकसान झाले. रिक्षाचालक सामाजी विठ्ठल मरगळे (वय ४४ वर्षे, रा. सिंहगड रस्ता, पुणे) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या डाव्या पायाला गंभीर फ्रॅक्चर, अंगावर जखम आणि अंतर्गत दुखापती झाल्याची प्राथमिक माहिती आहे. रिक्षेत दोन प्रवासी देखील होते, जे सौम्य जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेतली आणि जखमींना जवळच्या धायरी येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मरगळे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना ससून रुग्णालयात हलवण्यात आले असून, त्यांच्यावर सध्या सर्जरी आणि इंटेंसिव्ह केअर सुरू आहे. प्रवाशांना प्राथमिक उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला आहे. अपघातानंतर कारचालकाने कारसह घटनास्थळावरून फरार होण्याचा प्रयत्न केला. मात्र, सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिकांच्या मदतीने सिंहगड रस्ता पोलिसांनी केवळ ३ तासांत त्याला धायरी परिसरातून अटक केली. कार जप्त करण्यात आली असून, चालकावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## घोडनदीवरील पुलाचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करा; अन्यथा संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना जलसमाधी देऊ-सुरेश भोर

आंबेगाव। प्रतिनिधी

**लाखणगाव, ता. आंबेगाव येथील बेल्हा जेजुरी महामार्गावरील घोडनदीवरील नवीन पुलाचे अपूर्ण काम तातडीने सुरु करा. तसेच जुन्या पुलाची त्वरित दुरुस्ती करुन वहातुक सुरळीत करा. अन्यथा संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना जल समाधी देऊ असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेश भोर यांनी दिला.**

या महिन्यात दोनदा नदीला आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात पुलाचे नुकसान झाल्याने खबरदारी म्हणून हा पुल वहातुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे बेल्हा जेजुरी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना लांबच्या पर्यायी मार्गाचा वापर करावा लागत असल्याने नाहक त्रास सहन करावा लागत आहे. एक महिन्यात दोनदा पुलावरून पाणी गेल्याने पुराच्या पाण्याने पुलाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पुलाच्या दोन्ही बाजूचे लोखंडी कठडे वाहून गेले, काही ठिकाणी पूल खचला आहे, पुलावर मोठे मोठे दगड आले आहे. डांबर उखडून भेगा पडल्या आहे. त्यामुळे वहातुकीसाठी जुना पूल धोकादायक बनला आहे. तसेच या ठिकाणी सुमारे १० कोटी रुपये खर्चाच्या नवीन पुलाचे काम सुरु झाले ६० ते ७० टक्के काम झाले आहे. परंतु अडीच वर्षापासून ते अर्धवट अवस्थेत बंद पडले आहे. अद्याप ते काम सुरु झाले नाही. मंगळवारी सकाळी सुरेश भोर यांनी नुकसान झालेल्या जुन्या पुलाची तसेच अर्धवट अवस्थेत बंद पडलेल्या नविन पुलाच्या कामाची पहाणी केली. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद बारबाही यांच्याशी भ्रमणध्वनी वर संपर्क करुन जुन्या पुलाची तातडीने दुरुस्ती करुन नवीन पुलाचे बंद पडलेले काम तातडीने सुरु करावे. अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला. यावेळी तालुका समन्वयक बाळासाहेब रोडे, विभाग प्रमुख माऊली पाटील, मार्तंड टाव्हरे, किसन टाव्हरे, नरेंद्र अण्णा भागवत व इतर शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

